ग्रंथसंपादक व ग्रंथप्रकाशक मंडळी

श्रीसयाजी साहित्यमाला

पुष्प १० वें

# नरसिंह मेहेता

M
922
M52A

किंमत ६ आणे

UNIVERSAL LIBRARY
OU_192173
UNIVERSAL LIBRARY

श्रीसयाजी साहित्यमाला-अंक २१७

# नरसिंह मेहेता

लेखक,

**दाजी नागेश आपटे**

बी. ए., एल. एल. बी., ॲडव्होकेट.

आवृत्ति पहिली

संवत १९८९

सन १९३३

किंमत

सहा आणे.

CHECKED 1936

मुद्रक—नरहरी माधवराव यंदे.

इंदुप्रकाश छापखाना, नं. ३८० ठाकुरद्वार, मुंबई.

या पुस्तकासंबंधानें सर्व हक्क प्रकाशकांनीं आपणाकडे राखून ठेविले आहेत.

प्रकाशक

दामोदर सावळाराम आणि मंडळी,

नं. ३८०, ठाकुरद्वार रोड, मुंबई नं. २.

श्री.

# विज्ञापना

आपल्या देशी भाषांतील साहित्याची अभिवृद्धि करण्याच्या सद्धेतूनें विद्याभिलाषी श्रीमंत सरकार महाराजसाहेब सयाजीराव गायकवाड, सेनाखासखेल, समशेर बहादूर, जी. सी. एस. आय., जी. सी. आय. इ., एलएल. डी. यांनीं कृपावंत होऊन दोन लक्ष रुपयांची जी रक्कम अनामत ठेविली आहे, तिच्या व्याजांतून "श्री सयाजी–साहित्यमालें"तून विविध विषयांवर पुस्तकें तयार करण्यांत येत असतात.

तदनुसार "**नरसिंह मेहेता**" या नांवाचा ग्रंथ श्री. दाजी नागेश आपटे, बी. ए., एल. एल. बी., बडोदा, यांजकडून तयार करवून उक्त मालेंतील २१७ वें पुष्प म्हणून प्रसिद्ध करण्यांत येत आहे.

| | | |
|---|---|---|
| भाषांतर शाखा,<br>प्राच्यविद्यामंदिर<br>बडोदें. | मं. र. मजमुदार<br>भा. मदतनीस. | भा. का. भाटे<br>विद्याधिकारी,<br>राज्य बडोदें. |

# प्रस्तावना.

मिराबाई या गुर्जर साधुस्त्रीचें चरित्र लिहिलें, त्याच वेळीं परम वैष्णवभक्त नरसिंह मेहेता यांचें चरित्र सुमारें चौदा वर्षांपूर्वीं मीं लिहिलें होतें. तें प्रसिद्ध होण्याचा योग सांप्रत येत आहे. हिंदुस्थानांतल्या निरनिराळ्या भागांत वैष्णव भक्तांचा जो संप्रदाय प्रचलित झाला, त्या सर्वांचें अंतरंग व प्रणालिका एकच आहे. त्यामुळें मराठी वाचकांना परभाषीय साधुसंतांचीं चरित्रें मनोरंजक वाटतील व त्यांतील रहस्य त्यांना पटूंहि शकेल. या उद्देशानेंच महाराष्ट्रीय वाचकांसाठीं हें चरित्र लिहिलें आहे. नरसिंह मेहेता हे गुजराथ भाषेचे आद्यकवि म्हणून प्रसिद्ध आहेत. त्यामुळें त्या काळची भाषा, परिस्थिति, आचार-विचार, लोकरिवाज, धर्मस्थिति वगैरे गोष्टींचें ज्ञानहि त्यांच्या चरित्रांत मिळूं शकतें. अशा चरित्रास याहून अधिक प्रस्तावनेची आवश्यकता आहे असें नाहीं. या पूर्वीचें 'मिराबाई' चें चरित्र बरेंच लोकप्रिय झालें आहे, त्याच पद्धतीचा सांप्रतचा प्रयत्न आहे.

वैष्णवजन तो तेने कहिये। जे परपीडा जाणे रे ॥

हें आतां जगत्प्रसिद्ध झालेलें पद्य ज्यांनीं रचिलें व त्यांत दिलेल्या वैष्णवजनांच्या वर्णनाबरहुकूम ज्यांनीं आपलें सर्व जीवन व्यतीत केलें, त्या 'नरसिंह मेहेतां'च्या चरित्राचा स्वीकार वाचकवर्ग प्रेमानें करतील, अशी आशा आहे.

बडोदें, रावपुरा.
मिति आषाढ वद्य ११ शके १८५५ } दा. ना. आपटे.

# विषयानुक्रमणिका.


| | | |
|---|---|---|
| १ | जन्म व बाल्यावस्था ... .... | ३ |
| २ | मेहेताजींचा गृहस्थाश्रम ... ... | १२ |
| ३ | भक्तिपरीक्षेचीं उदाहरणें ... ... | २४ |
| ४ | हारमालेचें ज्ञान .... .... | ३९ |
| ५ | काव्याचे गुणदोष .... .... | ४५ |
| ६ | हारमालेचा ऐतिहासिक उपयोग ... | ४६ |
| ७ | हारमाला आणि गुर्जर साहित्य .... | ४८ |
| ८ | हारमाला कोणी लिहिली .... .... | ४८ |
| ९ | त्यांच्या कवितेबद्दल सामान्य विचार .... | ५२ |
| १० | गुर्जर साहित्यावर त्यांची छाप .... | ५६ |
| ११ | काव्यकलेविषयीं त्यांचें ज्ञान .... | ५८ |
| १२ | रागरागिणी व गायनकला .... | ६२ |
| १३ | मेहेताजीचे धार्मिक विचार .... | ६६ |
| १४ | उपसंहार .... .... | ८१ |

श्री.

# नरसिंह मेहेता

भागवत संप्रदायांत जीं नररत्नें भरतभूमींत प्रसिद्धीस आलीं, त्यांत नरसिंह मेहेता यांचें नांव अग्रस्थानीं झळकत आहे. भक्तीला व सद्गुणांना देशकालाची मर्यादा नाहीं. सर्व भक्तांचें कुल एकच आहे. अशा या भागवत कुलांतीलच ते एक संतान होते. सौराष्ट्र अथवा काठेवाड या प्रांतांतील जुनागड या शहरीं त्यांचा भक्तिविलास सर्व वैष्णव भक्तांना आनंदवीत होता. सर्व भगवद्भक्तांप्रमाणें त्यांनाहि 'निंदा जगीं त्रास। अपमान उपहास॥ अर्थी विपर्यास॥' हे भोगावे लागले. तथापि, त्यांनीं आपली कृष्णभक्ति यत्किंचित्‌हि विचलित होऊं दिली नाहीं. सोन्याचा कस अग्नीवांचून नाहीं, अग्निदिव्यानें त्याची कांति अधिकच दीपित होते, हा सिद्धान्त त्यांच्याहि बाबतींत खराच ठरला. ज्ञानेश्वर, तुकाराम, इत्यादि महाराष्ट्रीय संत, तुलसीदास, कबीर वगैरे उत्तर हिंदुस्थानांतील साधु, चैतन्य, रामकृष्ण परमहंसादि वंगदेशीय संत व मिराबाईसारखी गुर्जर साध्वी, या सर्वांच्या चरित्रांत या

दृष्टीनें सारखेपणाच आढळतो. या सर्वांप्रमाणेंच त्यांनीं लोकापवादाची पर्वा बाळगिली नाहीं, व आपलें ध्येय सतत दृष्टीसमोर ठेऊन आपला मार्ग आक्रमण केला. मूर्ख व आग्रही अशा छलकांच्या छलासंबंधानें नरसिंह मेह-त्यानींहि अशीच अविकृत वृत्ति ठेविली. त्या संबंधानें ते म्हणतातः—

" × × ×, शुं करशे दुरीजन लवतां रे. "
" शामळायासु रंगभरी रमतां, कुटुंब सहु कोई रुढुं रे. "
" जो रुठो तो रुठजो, म्हारे नंदकुंवरसुं काम रे "
" कुटुंब सहु कोय केडे लागां, जणजण आगळ लवता रे, "
" हुं म्हारे मन, मन मांहे न आणुं, × × × ×"
" एवा रे अमो एवा रे, तमे कहो छो वळी तेवा रे "
" भक्ति करतां जो भ्रष्ट करशो तो, करशुं दामोदरनी सेवा रे."

असें कवन म्हणतां म्हणतां ते भक्तीच्या भक्कम व कठिण खडकावर धीटपणानें उभे होते. निर्मल भक्तिभावानें त्यांचा हृदयकुंज ईश्वराच्या मंजुळ भजनानें गजबजून गेला होता. सर्व प्रकारचे अभियोग, प्रतिरोध, उपहास, परिहास, या सर्वांची पर्वा न करतां ते स्वतःच्या विषयांत निमग्न होऊन आपला मार्ग आक्रमीत चालले. " जादव-रायसु स्नेह सबळो, पीठ घहुं उपर जेम लीटी रे. " ते म्हणत कीं, " भक्ति कारण मारो देह दुर्बल हजो, देह कारण राखे स्नेह जाण।" निराशेच्या अंधकारांत त्यांना आशेची वीज चमकतांना दिसत होती. प्रयत्नांत जरी

अपयश आलें, तरी ते उत्साहरहित होत नसत. स्वतःच्या संपूर्ण प्रेमाच्या पूर्णतेला पोहोंचेपर्यंत ते शनैः शनैः अध्यात्मविद्येच्या ध्यानांत दिवसेंदिवस खोल खोल उतरत होते. शेवटीं अज्ञानतातिमिरसंहारक ज्ञानचंद्राचा उदय झाला आणि त्याचे आल्हाददायक, शान्त, व धवल ज्योतिः-किरण त्यांच्या अंतःकरणांत विकासित झाले. त्यांचे अंतःकरण प्रफुल्लित झालें, आणि जीविताशा अंधकारमय नव्हे, पण प्रज्वलित झाली.

वर दर्शविलेले विचार त्यांच्या विशेष गुणधर्मांच्या प्रस्तावनेदाखल गणले जातील. आतां आपण क्रमाक्रमानें त्यांच्या चरित्रनाटकाचा पडदा दूर करूं, आणि त्यांतील प्रत्येक प्रवेशांत आपला नायक कशा रीतीनें खेळला, तें अवलोकून त्यावर मनन करूं. हा प्रयत्न विशेष रुचिकर होईल, असें वाटतें.

## जन्म, बाल्यावस्था आणि भक्तीचा अंकुर

नरसिंह मेहेता यांचा जन्म कोणत्या वर्षांत, कोणत्या दिवशीं आणि केव्हां झाला होता, त्या संबंधीं अद्याप पर्यंत कांहींहि निश्चित झालेलें नाहीं. स्पष्ट शब्दांत म्हणावयाचें म्हणजे, त्या संबंधात कांहींहि माहिती मिळाली नाहीं. या विषयावर निरनिराळ्या लेखकांकडून वेगवेगळे विचार आणि प्रमाणें दर्शविण्यांत आलीं आहेत. त्यांच्या जन्मासंबंधानें जर

कांहीं सांगतां येण्यासारखें असेल, तर तें इतकेंच कीं, ते संवत १४६९–७० त तळाजा गांवांत जन्मले होते, आणि तेथून ते संवत १४९०–९२ मध्यें जीर्णदुर्गाला गेले. कित्येक लोकांच्या मतें त्यांचा जन्म जीर्णदुर्गांतच झाला होता. पण हें मत पसंत पडण्यासारखें नाहीं. वस्तुस्थिति अशी दिसते कीं, ते तलाजालाच जन्मले होते. दुसरी पुष्कळ नागर कुटुंबें तलजाहून मांगरोळ आणि जुनागडाला येऊन राहिलीं होती; त्याचप्रमाणें मेहेताजीहि वयांत आल्यावर या नगरांत वास्तव्यासाठीं आले होते. शिवाय त्यांचें लग्न जुनागडाजवळ असलेल्या मजेवडी गांवांत झालें होतें, म्हणून आपल्या पत्नीच्या इच्छेनुरूप त्यांनीं येथेंच राहण्याचें ठरविलें असेल, ही गोष्ट विशेष संभवनीय आहे. इतकें निर्विवाद आहे कीं, त्यांच्या भक्तिमय जीवनाला याच ठिकाणीं आरंभ झाला. वर दर्शविलेल्या मताच्या आधारानें कोणी असें म्हणेल कीं, जर हें खरें आहे, तर मग जुनागडच्या प्रजेला मेहेताजी बद्दलचा अभिमान बाळगण्याचें फारसें सबळ कारण नाहीं; परंतु त्याला उत्तर इतकेंच आहे कीं, मेहेताजींनीं स्वतःच जुनागडला स्वतःची मातृभूमि कल्पिली आहे, त्यांच्या माहात्म्याचा प्रकाश जुनागडच्या नागरवाड्यांतूनच चोहोंकडे पसरला, व ते ‘ नरसिंह मेहेता ’ म्हणून जुनागडहूनच प्रसिद्धि पावले. ते वडनगरी नागर जातीचे गृहस्थ होते. त्यांच्या वडिलांचें नांव कृष्णदास होतें.

कृष्णदासाची गृहस्थिति फारशी समाधानकारक नव्हती. नरसिंह मेहेता आठ वर्षांचे होते, तेव्हां कृष्णदास परलोकवासी झाले, असें म्हणतात. त्या दिवसापासून बिचारे मेहेताजी आपल्या वडील बंधूच्या आश्रयास जाऊन राहिले. नरसिंहरावाला दुसरे दोन भाऊ होते. त्यांतील कोणत्या भावाच्या जवळ ते गेले, त्याची आपल्याला माहिती मिळत नाहीं. त्यांच्या त्या उभय बंधूसंबधानें पण कांहीं निश्चयपूर्वक सांगतां येत नाहीं. वैष्णवांच्या वंशवृक्षावरून कांहीं निराळाच बोध होतो, आणि प्रेमानंद वगैरे कवी कांहीं वेगळेच सांगतात. परंतु ते एका भावाबरोबर रहावयास गेले होते, एवढें मात्र खरें आहे. आतां मेहेताजींच्या विद्याभ्यासाविषयीं आपण विचार करूं. मेहेताजी सुशिक्षित होते का अशिक्षित होते, या प्रश्नाचा निर्णय करण्याचें काम अत्यंत कठिण आहे. कांहीं म्हणतात कीं, तें अगदीं अशिक्षित होते, व उडाणटप्पू होते. इतर म्हणतात कीं, त्यांनीं कांहीं शाळेंत अभ्यास केला नव्हता खरा, परंतु स्वतःच्या उत्तरवयांत साधुसंतांच्या समागमानें किंचित् शास्त्रीयज्ञान त्यांनीं मिळविलें होतें; व कांहीं असेंहि प्रतिपादन करतात कीं, त्यांनीं संस्कृत भाषेचा अल्पकाल तरी अभ्यास केला असलाच पाहिजे. या शेवटच्या मताला कांहीं आधार सांपडतो खरा. मेहेताजींनीं स्वतःच्या कवितेंत संस्कृत शब्दांचा पुष्कळ उपयोग केलेला आहे,

म्हणून कदाचित हें अनुमान युक्त होऊं शकेल. पण त्यावरून ते चांगल्या प्रकारें शिकलेले होते, असें सिद्ध होऊं शकणार नाहीं. मेहेताजींची जन्मभूमि जी तलाजा, त्यावर लिहिलेल्या ‘ तलाजाची टेकडी ’ नांवाच्या एका लेखांत असें म्हणण्यांत आलें आहे कीं, त्या तलाजा गांवांत मेहेताजींची शाळा या नांवाची एक जागा आहे व तेथें सध्यां मारुतीची मूर्ति ठेवली आहे. त्या शाळेच्या संबंधीं असें सांगण्यांत येतें कीं. मेहेताजी त्या शाळेंत शिक्षक होते. हें उक्त स्थळ आणि लोकांच्या कल्पना, या वरून प्रथमदर्शनींच असें अनुमान निघतें कीं, नरसिंह मेहेता त्या शाळेंत शिकत अथवा शिकवीत असले पाहिजे. या द्विविध अनुमानावरून जें कोणाला योग्य वाटेल तें त्यानें स्वीकारावें. पण मेहेताजींनीं त्या वेळीं मिळण्याजोगें शिक्षण घेतलें होतें, ही गोष्ट सिद्ध होत आहे. या नंतर त्यांनीं रचिलेल्या कविता, त्यांत उपयोजिलेले शास्त्रीय ज्ञान, इत्यादि सर्व वरील मताची साक्ष देत आहेत. या समग्र गोष्टींचें एकीकरण करून विचार केला तर, मेहेताजींना एक मोठे पंडित म्हणतां आलें नाहीं तरी, साधारणपणें त्यांची शिकल्यासवरलेल्यांत गणना होईल. आतां आपण त्यांच्यावर ‘ रखडु रझलु ’ ह्या शब्दांनीं ठेवल्या जाणाऱ्या आरोपांचें समाधान करूं या. मेहेताजी आळशी असतील असें म्हणतां येणार नाहीं. कारण मेहेताजीकृत प्रसिद्ध ‘ हारमालेच्या ’ दुसऱ्या पदांत ते स्वतः लिहितात कीं,:—

" एक द्विवस उद्यमने गयो तो, ते छेने तुं जाणी।
आखा दिवस रळी खपी आव्यो, भाभीए न पायुं पाणी ॥ "

या पदावरून सहज समजून येईल कीं, ते केवळ निरुद्योगी व निरुत्साही पुरुष नव्हते. कदाचित् असें असेल कीं, ते स्वतःच्या बंधूसारखे उद्योगी व कमावणारे नसतील ! आणि म्हणून त्यांची भावजय त्यांनां उपहासयुक्त वाणीनें कांहीं लागतील असे शब्द बोलली असेल. गरीब आईबापांचे पोटीं जन्मलेला भाऊभावजईच्या हाताखालीं मोठा झालेला, स्वतःच्या वैराग्यवृत्तीमुळें प्राप्त होणाऱ्या गरीब स्थितींतील दुःखाचा अनुभव असणाऱ्या, आणि " भाभीए न पायुं पाणी, कह्युं ते कठिण वचन ।" त्या योगानें विरक्त होणाऱ्या, नरसिंह मेहेताजींना आत्मनिष्ठा आणि स्वात्माभिमान संपूर्ण होता. अशा उच्चभावना मनुष्याच्या सुसंस्कृत स्वभावाचें चिन्ह होय. बाल्यावस्थेंत वैराग्य बाणल्यानें आणि संसाराला अनभ्यस्त असल्यानें, ते थोडे कमविणारे आणि म्हणून स्वतःच्या भावाला एक प्रकारें भारभूत झाले असले तर, त्यांत आश्चर्य वाटण्याजोगें नाहीं. त्यांच्या भावजईला त्यांचें हें वर्तन सहन झालें नाहीं, ही गोष्ट पण स्वाभाविक आहे. दारिद्र्यानें उत्पन्न होणारीं दुःखें पुष्कळ वेळां सहनशीलतेचा भंग करितात. भाऊ दरिद्री असल्यानें मेहेताजींची भावजय त्यांना मर्मी लागण्याजोगें बोले, ही गोष्ट पण संभवनीय आहे. " मर्म वचन कह्यां मुझने भाभीए, ते मारा

मनमां रह्यां वहुंधी । " या शब्दांनीं मेहेताजींचें हृदय विदीर्ण होऊन गेलें. त्यांच्या सहनशीलतेचा अन्त झाला, त्यांना त्या स्त्रीच्या द्वेषयुक्त वर्तनाचा कंटाळा येऊन गेला, आणि त्याच क्षणीं मेहेताजींनीं "लागी दाझ, परित्याग कीधो घरतणो, महेतो बन गया तप काज । " मेहेताजींचें स्वरूप असें बदललेलें पाहून, ते लिहितात त्याप्रमाणें भावजय त्यांना म्हणाली कीं, " उठो दियरिया हुं हसती हती, तत्क्षण आपुं पाणी । " मेहेताजी तेथून उठले व गोपीनाथ महादेवाच्या देवळांत जाऊन शंकराचें ध्यान करीत मेहेताजींनीं त्याची सात दिवसपर्यंत स्तुति केली. आणि अन्न पाणी सर्व सोडून दिलें. अखेरीस शंकर प्रसन्न होऊन त्यांनीं त्यांस वर मागावयास सांगितलें, आणि मेहेताजींचा भाग्योदय अशा रीतीनें झाला. शंकरांनीं त्यांना म्हटलें ' परमात्मा श्री लक्ष्मीपति सांसारिक सुखाचा उपभोग घेत आहेत; चल, तूं आपल्या डोळ्यांनीं त्यांच्या रास-क्रीडेचें दर्शन घे, आणि गोपींच्या मधुर आणि सुंदर गायनांचें श्रवण कर व हें सर्व तूं कवितारूपानें वर्णनकर. जे लोक तें ऐकतील अथवा म्हणतील, ते मुक्ति पावतील. ' शंकरांबरोबर मेहेताजी वैकुंठीं गेले, आणि तेथें श्रीकृष्णाच्या रासक्रीडेचें त्यांना साक्षात् दर्शन झालें. नंतर कमलाकांताच्या सेवेंत ' एकवीस दिवस ' घालवून श्रीच्या आज्ञेनें ' ताल वातानें गीत गातां ' या

पृथ्वीवर ग्रहस्थाश्रमाचा अनुभव घेण्यासाठीं आणि तो घेतांना हरीचा महिमा वर्णन करण्याकरितां ते आले. नरसिंह मेहेताला जें रासक्रीडेचें दर्शन झालें, तें त्यांच्या गोपींकाव्यांचें मूळ समजावें. मेहेताजी म्हणतात कीं, " भाभीए भाग्य उदय कर्यां, मने कह्यां ते कठण वचन।" ते स्वत:च्या भावजईच्या वाक्प्रहारानेंच कंटाळून पळून गेले होते आणि शंकराच्या स्तुतींत निमग्न झाले होते. त्यांच्या भावजईनें जें शब्दविष त्यांना दु:ख देण्याकरितां पाजलें होतें, तेंच विष मेहेताजींचें नांव अमर करण्याला एक मुख्य साधन झालें. शंकर प्रसन्न झाले त्या दिवसापासून आणि त्याच क्षणापासून ऐहिक सुखा-वरून त्यांचें चित्त उडून गेलें; त्याच क्षणापासून हा संसार असार व स्वप्नवत् असा त्यांना भासूं लागला, भक्तिर-साच्या प्रतापानें त्यांचा मन:सागर उचंबळूं लागला, त्यांच्या अंत:करणांत प्रशंसनीय तेज:पुंजाच्या उज्वल प्रभेचीं किरणें प्रकाशावयास लागलीं. निर्विकारी, प्रेमानंदमय, व स्फूर्ति पावलेल्या अशा त्यांच्या हृदयांतून प्रवाह पावणारी व सतत वाहणारी कविता, नदीच्या पाण्याच्या तुषारवृष्टीप्रमाणें मनुष्यांच्या मलाचें क्षालन करावयास लागली. भावजईच्या बोलण्यानें आलेल्या रागाचें रूपा-न्तर होऊन गेलें. त्यांनीं जाऊन भावजईला नमस्कार केला आणि ते नम्रतापूर्वक म्हणाले कीं, " तें वज्रबाण जेवुं

मेणुं मार्युं, ने तें म्हारूं दुखडुं सहेजे हर्युं।" आणि प्रेमानंद लिहितात त्याप्रमाणें:—

"आवीने भाभीने चरणे नम्या दीधुं आशिवचनजी।"
"श्रीहरि ने हर मुझने मळ्या, ते तमारुं पुन्यजी.।"
"पुन्य तमारुं मात मारी, मुझने हेले मळीयाजी।"
"गाळ नहि ए आशिष दिधी, जन्ममरण दुःख टाळियांजी।"

धन्य आहे मेहेताजींच्या सदूवृत्तीची! त्यांच्या महान् भक्तीबद्दल जरा विचार करा. त्यांच्या सरळ स्वभावाची किती प्रशंसा करावी? काय त्यांची उदारता वर्णावी! भावजईनें द्वेषभावानें उच्चारिलेल्या शद्बांबद्दल वापरण्यांत आलेलें त्यांचें वाक्चातुर्य कसें मोहक आणि मार्मिक आहे!

या प्रमाणें मेहेताजींच्या चरित्रनाटकाचा भक्तिलाभ नांवाचा पहिला अंक संपूर्ण झाला. त्यांची बाल्यावस्था, त्यांची निराधार स्थिति, त्यांचा अपमान व त्यांत त्यांनीं दाखविलेलें मनोधैर्य, त्यांची निर्धनता आणि सर्वव्यापक जगन्नियन्त्याच्या उपासनेंत त्यांची तल्लीनता, वगैरे सर्व वृत्तांत त्यांच्या चरित्राचा प्रभातकाळ शोभवीत आहे. जर त्यांच्या गरीब आईबापांनीं त्यांना गरीब अवस्थेंत भाऊभावजईच्या आश्रयाखालीं ठेवले नसते; जर त्यांच्या वडिलांचे ठिकाणीं असलेल्या वडील बंधूच्या बायकोकडून त्यांचा अपमान झाला नसता, तर मेहेताजींना शंकराला शरण जाण्याची जरूरच पडली नसती, आणि

त्यांचें जें नांव आजतागायत प्रसिद्ध आहे, तें कधींहि झालें नसतें. परंतु ज्याच्या नशिबांत ज्या वेळीं जें होणारें लिहिलेलें असतें, तें त्याला त्यावेळेस मिळणारच. मनुष्याच्या अंत:करणांत जशी भावना असते, तसें त्याचें आचरण घडतें. मेहेताजींच्या नशीबीं भक्तरुपानेंच प्रसिद्धीस येण्याचें लिहिलें होतें, म्हणून त्यांनीं दु:खामुळें सर्व शक्तिमान जगन्नियन्त्याचें अहोरात्र चिंतन केलें आणि त्याची प्राप्ति झाल्यानें ते स्वत: एक परमेश्वरावतार गणले गेले. मेहेताजींच्या भक्तिपरायण बुद्धीनें चकित झालेल्या प्रेमानंद, दयाराम वगैरे मोठमोठ्या कवींनीं त्यांच्याविषयीं अतिशय पूज्यभाव दर्शविला आहे. मेहेताजींच्या भावजईचीं भाषणें फक्त निमित्तमात्र झालीं. चालत्या गतींत फरक करण्याकरितां एखादा चटका तरी आवश्यक असतो. आपल्यासारख्या साधारण मनुष्यांना त्यांच्यासारखी दृढता आणि कल्पनातीत एकनिष्ठा कशी येणार ! एखादा प्राकृत प्राणी ईश्वरप्रेरणेवांचून अशी कठिण तपश्चर्या करूं शकेल काय ? क्रोधांतीं भक्तिभावच उत्पन्न होईल, असें अनुमान आपण सदोदित कसे करूं शकूं ! एका क्षणांत संसारसुखाचा त्याग करून ते तपश्चर्या करण्यास गेले, ही गोष्ट ईश्वरप्रेरणेशिवाय संभवनीय आहे काय ? नरसिंह मेहेता यांची निर्मल बुद्धि व तारुण्यावस्थेच्या उच्छृंखळणाच्य कल्पना स्वाभाविकरीत्या अविचाराच्या होत्या. भाव

जईच्या वाग्बाणानें मेहेताजींचें मन बदलून टाकलें, आणि भक्तिसुधारसाच्या आल्हादजनक मोहिनींत त्याना तल्लीन करून सोडलें. त्यांच्या मनोनिग्रहाचें कारण फक्त त्यांचें अंतःकरण, पण त्यांचें खरें कारण त्यांची शुद्धता आणि त्यांचें अपरिमित दैविक बळच होतें. मनुष्याची चित्तवृत्ति एका क्षणांत कशी पालटूं शकेल ! मूर्खाला पंडित, पंडिताला मूर्ख, संसारिकास विरागी आणि विराग्याला संसारिक; अस्तिकाला नास्तिक व नास्तिकाला अस्तिक करण्यांत तिच्या अनंत शक्तीची कल्पना होते. मनुष्याच्या बंधनाचें अथवा मोक्षाचें कारण मनच आहे ! मेहेताजींचे विचार, वाणी आणि आचार बदलून टाकणाऱ्या व त्यांचें अखिल जीवित आश्चर्यमय करणाऱ्या मनोवृत्तीच्या लीला अगाध आहेत !

## मेहेताजींचा गृहस्थाश्रम.

आतां नरसिंह मेहेतांच्या ग्रहस्थाश्रमाकडे आपली दृष्टि फिरवूं या. त्यांचें लग्न मजेवाडींत राहणाऱ्या एका नागर ग्रहस्थाच्या कन्येबरोबर झालें होतें. हा संबंध होण्याच्या पूर्वीं त्यांचें लग्न दुसऱ्या कोणत्या मुलीबरोबर झालें होतें कीं काय, या प्रश्नाबद्दल विवेचन करण्याचें मला कारण दिसत नाहीं. पण इतकें सांगणें जरुर आहे कीं, मेहताजी वयांत आल्यानंतर मजेवाडी येथील माणेक नांवाच्या एका मुलीबरोबर त्यांचा विवाह झाला होता,

आणि त्याच दिवसापासून त्यांचें वास्तव्य जुनागडांत झालें होतें. असें म्हणतात कीं, मेहताजींच्या ग्रहस्थाश्रमाच्या प्रारंभकाळांत त्याचे आपल्या पत्नीबरोबर चांगलेसें पटत नव्हतें, आणि म्हणून ती माहेरीं निघून गेली होती. ही गोष्ट जर खरी असेल, तर त्यांत मेहेताजी दोषी ठरूं शकत नाहींत. 'जग आणि भक्त' या गोष्टीच परस्परविरुद्ध असतात. त्यांच्या मनांत संसाराविषयीं लालसा नव्हती; ते ज्ञानी व विवेकी होते. ते सृष्टिरुपीं रंगभूमींत होणाऱ्या खेळाचे प्रेक्षक होते. आत्मानुभवाच्या परमपीठिकेवर स्थिर उभे राहून, स्वजातीयांवर ते दयादृष्टीनें आणि बंधुप्रेमानें पहात होते. ते ब्रम्हनिष्ठ झाल्यावर जगन्मित्रत्वाच्या तत्त्वांत मिळून गेले होते. भक्तिरूपी अगाध सागरांत स्नान करून ते भिन्न भिन्न आत्म्यांत वसणाऱ्या परमात्म्याशीं एकतान होऊं इच्छित होते. त्यांच्या बायकोचा त्यांच्याशीं बेबनाव होता; त्यांच्या ज्ञातिबांधवांनीं त्यांचा त्याग केला होता; त्यांच्या नातेवाइकांनीं त्यांचा तिरस्कार केला होता; आणि सर्व समाजानें त्यांचा उपहास केला होता. जरी त्यांची पत्नी रुसून माहेरीं निघून गेली होती, तरी त्यांनीं त्या गोष्टीची काळजी केली नाहीं, आणि ज्या सत्कार्यांत ते गढून गेले होते, तें कार्य त्यांनीं एकचित्तानें अखंडित चालू ठेवलें. जरी त्यांची पत्नी आर्य स्त्री असून उच्च वर्णाची होती, तरी तिला आर्य स्त्रीचा खरा धर्म समजला

नव्हता. परंतु शेवटीं तिच्या मनांत प्रकाश पडला, आणि ती परत आली. ती आल्यागेल्याचें त्यांस कांहींच वाटलें नाहीं. ही गोष्ट खरी असेलच असें माझें म्हणणें नाहीं, कारण मेहेताजी स्वत: आपल्या बायकोचें 'पतिव्रता' या नांवानें वर्णन करीत असत, आणि ती पतिव्रता मेहेताजींच्या वृत्तीला अनुसरून रहात होती, या गोष्टीची प्रचीति आपल्याला त्यांच्या कवितेवरून होत आहे. आतां हें खरें असेल कीं, मेहेताजींच्या भक्तिमार्गाच्या ती आड येत असेल, कारण आपण मेहेताजींच्या कविता सूक्ष्म दृष्टीनें अवलोकितांना आपणाला आढळून येतें कीं, ती आपल्या गृहसंसाराच्या गोष्टीकडे लक्ष ठेऊन सदोदित मेहेताजींना गृहस्थ या नात्यानें बजावण्याच्या कर्तव्यांचें स्मरण करून देत असे. मनुष्य जीवन ही अशी स्थिति आहे कीं, त्यांत या लोकीं धर्मानें वागून परलोकीं उच्च कार्य साधावयाचें असतें. ती या लोकांत धर्माचरणानें वागून कार्य करीत होती, आणि मेहेताजी परलोकांत मिळणाऱ्या सुखोपभोगाची तयारी करीत होते. हा मानवजीवितरूपी रथ कांहीं एका अनिश्चित परंतु अवर्णनीय बिंदूकडे जात आहे असें जर आपण म्हटलें, तर इष्ट स्थळीं पोहाचण्याचें कार्य सुगम करण्याला त्या रथाचें एक चक्र त्यांची पत्नी आणि दुसरें चक्र मेहेताजी होते. मेहेताजींनीं आपल्या घराच्या आवारांत तुळशींची झाडें लावलीं होतीं, आणि ते स्वतः साधुसंतांच्या मेळ्यांत

जाऊन तेथें भगवद्गुणगायनात आपला वेळ खर्च करीत असत. त्यांचा वेष भक्ताला अनुरूप असाच होता. डोक्यावर पगडी, अंगांत बारीक वस्त्राचा पायघोळ अंगरखा, तसेंच कमरेला उपरणें बांधलेलें व हातांत झांज व अंत:करणांत भक्तीरस ओतप्रोत भरला असल्यामुळें ते खाण्यापिण्याविषयीं निश्चित रहात असत. गळ्यांत तुळशीची माळ होती, म्हणून त्यांना वस्त्रालंकार तुच्छ होते. कपाळीं विशाल चंदनाचा टिळा लावणें, शालिग्राम व बालमुकुंदाची पूजा करणें, देवळांत जातांना भक्तजनांबरोबर हरीकीर्तन करणें, आणि साधुसमाजांत जाऊन नाचत नाचत भक्ती-पर पदें म्हणणें, हें त्यांचें नित्यकर्म होतें. ते मनुष्यप्राणी असल्यामुळें जीवनाकरिता थोडेंफार अन्न ग्रहण करणें त्यांस भागच असे. प्रेमानंद म्हणतात, " विश्वंभर पूरुं पाडे अन्न, विश्वास घणो मेहेताने मन। " " जेथें विश्वास तेथें विश्वंभर " या सिद्धान्ताला अनुसरून ते आपलें कर्तव्यकर्म करून संतुष्ट राहत असत. मेहेताजींच्या भक्त-मंडळाबद्दल एके ठिकाणीं असें म्हटलें आहे कीं, त्यांच्या समाजांत स्त्रीवर्ग सुद्धां भाग घेत असे. पण यावरून त्यांचे चरित्राविषयीं शंका घेणें इष्ट नाहीं. मेहेताजींच्या भक्तमंडळांत बायका भाग घेत होत्या, यांत शंकेचें कांहींच कारण नाहीं. कारण असल्या महात्म्यांच्या ठायीं स्त्रीपुरुष भेद राहतच नाहीं. ते आपल्यालाच स्त्रीरूप समजून श्रीकृष्णाला पतिरूप समजत. " तुं वनमाली

कह्रावे, हुं कुसुम वनवेलडी।" अशा रीतीनें ते भेद-भाव विसरत असत. आत्मा जेव्हां स्थूल देहांतील विषयवासनेपासून मुक्त होऊन परमात्म्याच्या भक्तींत लीन होतो, तेव्हां कांहीं लिंगभेद राहतच नाहीं, असें तें मानीत होते. आत्मा एकच आणि तो प्रभूचा अंश होय. भिन्न भिन्न प्रकृतींत आत्मा एकच आहे व तो अमर आणि अदृश्य आहे. प्रकृति प्रत्यक्ष आणि क्षणभंगुर आहे. ते म्हणतात कीं, आपल्याला तत्त्व प्रिय आहे, भास प्रिय नाहीं. लौकिकदृष्ट्या स्त्रीपुरुष भिन्न आहेत, पण अनंत पुरुषाच्या दरबारांत ते एकच आहेत. एकच मृत्तिकापिंडांतून बनलेले भिन्न आकृतीचे ते पुतळे आहेत, ते एकाच वस्तूच्या अन्तर्गोल आणि बाह्यगोल आकारा-समान आहेत. स्त्रीपुरुष या दोघांना एकाच नियमानें उत्पन्न करण्यांत आले आहे. त्यांच्या जीविताचा आशय एकच आहे. परमात्म्याला भजण्याचा धर्म त्या उभयांचा एकच आहे. बायका पुरुषांच्या बरोबर भक्तिविलासांत सामील झाल्या, तर त्यांत वावगें तें काय! ती गोष्ट लज्जा-स्पद नाहीं, व तिरस्कार उत्पन्न करविणारीहि नाहीं. मेहेताजी तर फक्त एकाच रंगानें रंगलेले, एकाच तेजानें दिपून गेलेले व अनन्य भक्तींत गढलेले होते. मेहेताजी गोपींबरोबर गोपींसारखे होते, आणि परमात्मा मुरलीधर सर्वांच्या पतिसमान होते. कृष्णानें वाजविलेल्या बारीक मुरलीनें सर्व गोपींची अंतःकरणें भरलीं होतीं. अशा

स्थितींत मेहेताजी " गुणाः पूजास्थानं गुणिषु न च लिंगं न च वयः ।" या सूत्राला अनुसरले, तर त्यांत काय आश्चर्य !

या नंतर मेहेताजींना एक मुलगा आणि मुलगी झाली. मुलीचें नांव कुंवर आणि मुलाचें नांव शामलदास ठेविलें होतें. हिंदु गृहस्थाचे घरीं पुत्रजन्म हा एक महोत्सव गणला आहे. कारण कीं, बापाच्या मागें पिंड देण्यास मुलांवाचून दुसरा कोणी श्रेष्ठ अधिकारी नाहीं. पण मेहेताजींची ' शेट आळे कीं, टाका वखारींत ' अशी स्थिति होती. आतां त्यांच्या चरित्रनाटकाच्या द्वितियांकाला आरंभ झाला. कालचक्र नेहमींच्या गतीनें फिरतच होतें, अशा स्थितींत कांहीं वर्षें लोटलीं. मुलें लग्नाला योग्य झालीं. मातुश्रीच्या काळजीला तर अंतच नव्हता ! कुंवरबाईचें लग्न केलेंच पाहिजे. कारण ती पडली नागराची जात ! माणेकबाई मनांत कुढे, पण मेहेताजी तिकडे कानाडोळा करीत. शेवटीं महत्प्रयासानें लग्नाचा शुभ दिवस जवळ आला, आणि मेहेताजींनीं थोड्या फार अडचणी सहन करून तो दिवस तर पार पाडला. उना गावांत राहणाऱ्या श्रीरंग मेहेताच्या मुलाशीं कुंवरबाईचें लग्न झालें. हें कार्य झाल्यावर थोड्याच मुदतींत दुसरी जबाबदारी त्यांच्यावर येऊन पडली. माणेकबाई आपल्या मुलाच्या लग्नासाठीं फार उत्सुक झाली होती. हिंदु बायकांचा स्वभावच असा आहे कीं, कोणत्याहि प्रकारच्या

अडचणी सोसून सून घरीं आणून सासूपणाचा मान भोगावयाचा ! त्यांच्या पत्नीची उत्कंठा फारच वाढली होती. शेवटीं तिच्याच्यानें स्वस्थ रहावलें नाहीं, आणि ती मेहेताजीजवळ जाऊन म्हणूं लागली कीं,

" द्वादश वरश वीती गयां कुंवरने ।
कामिनी आवीने उभी पासे ।
आपणुं घर तो आदी मोटुं घणुं ।
निर्धन विवाह ते केम थशे ? "

मेहताजी आपल्या बायकोला धीर देऊन म्हणूं लागले कीं,

" दु:ख न कर कामिनी, वात सुण भामिनी,
पुरशे मनोरथ कृष्णकामी,
" ध्यान धर कृष्णनुं, राख मन कृष्णनुं,
सार करशे नरसियाधो स्वामी. "

अशा रीतीनें उद्वेग आणि विश्वास या उभय मनोवृत्तींचें युद्ध कित्येक दिवसपर्यंत चाललें, आणि त्यांत 'विश्वासाचा' विजय झाला. वडनगरच्या राजाचा प्रधान मदन मेहेता याच्या घरीं एक आठ वर्षांच्या वयाची मुलगी होती, तिच्या लग्नाकरितां तो प्रधान फिकीरींत पडला होता. वडनगरांत " नथी जोग कन्यातणो " म्हणून त्यानें आपल्या 'उपाध्यायाला' एखादा चांगला वर शोधण्यास जुनागडला पाठविलें. दीक्षित त्या नगरांत गेले, परंतु योग्य वर मिळाला नाहीं. " धनवंत त्यांहा कुलाचार देखे नहिनिर्धन ते कुलवंत कहावे. "

अशी स्थिती पाहून दीक्षित तर निराश होऊन गेले, आणि परत वडनगरीं जाण्यास निघाले. नागर लोकांस या गोष्टीची माहिती होतांच त्यांनीं नरसिंह मेहेतांची टवाळी करण्याचा विचार केला, आणि दीक्षितांना त्यांच्या घरीं पाठविलें. मेहेताजींनीं त्यांचा आदर सत्कार केला, आणि आपल्या मुलाचें लग्न नक्की करून टाकलें! दीक्षित वडनगराला निघून गेले, आणि तेथें जाऊन त्यांनीं मदन मेहेताला हकीगत कळविली. त्याबरोबर मदन मेहेताच्या बायकोचें मन क्रोधानें व्यापून गेलें, आणि लग्नसंबंध तोडून टाकण्याचा ती आग्रह करूं लागली. परंतु प्रधानजीनें तिचें समाधान केलें, आणि लग्नाचा दिवस नक्की ठरविण्याची गुरुजीला विनंति केली. नरसिंह मेहेताला लग्नचिठ्ठी पाठविली आणि वधूपक्षाकडील मंडळी लग्नाच्या शुभप्रसंगाच्या धामधुमींत गर्क झाली. मेहेताजींनीं शार्ङ्ग-पाणीचें स्मरण केलें, त्याबरोबर लग्नाला लागणारी सर्व सामुग्री त्यांच्या येथें येऊन पडली. "सामळदासाचें लग्न" या नांवाच्या काव्यांत मेहेताजी लिहितात कीं, आपल्या मुलाचें लग्न अतिशय थाटानें केलें गेलें, आणि श्रीकृष्ण भगवानांनीं वचन दिलें होतें, त्या प्रमाणें त्यांनीं लग्नाला येऊन जास्त शोभा आणली. या काव्यांत मेहेताजींनीं लग्नमंडप, जेवण, वरात इत्यादि गोष्टींचें अतिशय सुंदर वर्णन केलें आहे. लग्न करून घरीं आल्या-नंतर थोड्याच अवधींत मेहेताजींवर अकस्मात दुःखाचा

डोंगर कोसळला. त्याची पत्नी-प्रेमळ पण विपत्तीनें गांजलेली-माणेकबाई परलोकवासी झाली. मेहेताजींच्यावर व त्यांच्या देखरेखीखालीं मोठ्या झालेल्या दोन अपत्यांवर आपत्ति येऊन पडली. आपल्या मुलांना आश्वासन देणारी आई, प्रेमळ माता, मेहेताजींची " सती पतिव्रता " या अशाश्वत जगताला सोडून गेल्यावर, तीं बिचारीं बहिणभावंडें आपल्या बापाच्या पाशीं आलीं, पण बाप भक्तिपरायण असल्यामुळें सर्व सुखासाठीं तो ईश्वरावर विश्वास टेऊनच राहत होता. आई वारल्यानंतर तारुण्यावस्थेंत आलेला शामळदास परलोकवासी झाला आणि नरसिंह मेहेताची सुखाची सर्व आशा नष्ट झाली ! कोमल व निर्मल पुष्प तारुण्यावस्थेंत सुकून गेलें तर मग कविहृदय तळमळेल यात काय नवल ! असें कोणाचें अंतःकरण आहे कीं, ज्याला अशा दुःखोत्पादक वृत्तांतानें पाझर फुटणार नाहीं ? असा कोणी तरी मनुष्य आहे कां, कीं ज्याला अशा प्रसंगीं अत्यंत दुःख व मनस्ताप होणार नाहीं ! पण विधात्याच्या खेळांत खेळणाऱ्या, संकटाच्या सुळावर चढून निर्भय राहणाऱ्या, जीवन्मुक्त मेहेताजींचें मन या प्रसंगींहि स्थिर व शांत होतें. ' जें होतें तें चांगल्याच करतां, ' असें त्याचें मत होतें.

" सुख दुःख मनमां न आणिए, घट साथेरे घडियां "
" टाळ्य. ते कोईन. नव टळे, रघुनाथन जडियां, "

असें ते मानीत होते. कविमणि प्रेमानंद म्हणतात कीं, माणेकबाई आणि शामळदासाच्या मरणानें मेहताजींचें मन तर

" भलु थयुं भांगी जंजाळ, सुखे भजसुं श्रीगोपाळ।"

असें झालें.

यावरून असें अनुमान करावयाचें नाहीं कीं, मेहेताजी आपल्या अखिल कुटुंबाचा विनाश इच्छित होते. तसें करण्यांत त्यांचा कांहीं स्वार्थ नव्हता. प्रारब्धापुढें मनुष्याचा प्रयत्न निरर्थक आहे. वरील वाक्याचा अर्थ इतकाच कीं, मेहेताजी संसाराच्या सुखाच्या चित्राकडे तिरस्कारयुक्त दृष्टीनें अवलोकीत होते. बायको आणि मुलगा मरण पावला म्हणून मेहेताजी खेद कां करतील? त्यांची पक्की खात्री होती कीं, हा संसार स्वप्नवत् आहे, मायेचें जाळें आहे. " सुख संसारि, मिथ्या करी मानजो, कृष्ण विना बीजुं सर्व कांचुं।" याप्रमाणें आपलें मन स्थिर करून मेहेताजींनीं, मृत्यु आला तर आला, ही गोष्ट आपल्या हातची नाहीं, असें मानलें तर त्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. मरणानें उत्पन्न होणारें दुःख हें दुःख नाहीं. मरणें म्हणजे मायेपासून मुक्त होणें, असें त्यांचें मत होतं. ज्ञानदीपकानें त्यांचें अज्ञान नष्ट होऊन गेलें होतें. आतां मुलांचा सांभाळ करावा हेंच त्यांचें, गृहस्थ या नात्यानें कर्तव्य बाकी राहिलें होतें. परंतु मुलगी तर परधन आहे. कुंवरबाई

आपल्या सासरीं होती. तिचा डोहाळपणाचा समारंभ जवळ आला. मेहतार्जीना नातू होण्याचे दिवस नजीक आले. मेहेताजी उन्म येथें गेले. पुन्हां त्याची विटंबना झाली. बापाच्या दारिद्र्याची कुंवरबाईला माहिती होती, परंतु "आपलें घराणें फार मोठें म्हणून कुलकीर्तिला कलंक न लागण्याचा शक्य तो प्रयत्न केलाच पाहिजे, या विचारानें मेहेताजींनें आपल्या मुलीला अवश्य वस्त्राभरणाची यादी तयार करण्यास सांगितलें. दिसण्यांत दरिद्री पण शुद्ध व प्रेमळ बापाच्या तोंडून असे शब्द आले—

"अन्योन्य नयणां भरी, भेट्यां बेउओ आदर करी."
"मेहेते मुकी मस्तक हाथ, पासे बेसाडी पुछी वात."

कुंवरबाईच्या डोळ्यांतून अश्रुप्रवाह वाहूं लागला. तिचें अंतःकरण धडधडूं लागलें; तिचा चेहरा फिका पडून गेला, आणि सद्गदित कंठानें ती म्हणाली:-

"निर्माल्य निर्धननो अवतार, निर्धननुं जिव्युं धिकार,"

*　　　*　　　*

"माता विना सुनो संसार, माता विना ते शो अवतार;"
"जे बाळकनी माता गई मरी, बापनी सगाई साथे उतरी."

मेहेताजींनीं उत्तर दिलें कीं,—

* * * "पुत्री, रहो तमे विश्वासे"
"शामळियो अवसर नहीं भूले, तुं कां आंसुडा ढाळे?"

अहाहा! गरीब बाप आणि प्रेमी बालकाचा समागम! वात्सल्यभाव काय करीत नाहीं? कुंवरबाई! तुझ्या अशा

भाषणानें मेहेताजींचें अंतःकरण द्रवून टाकिलें नसेल काय? कुंवरबाई! कुंवरबाई! मेहेताजी तुला निराश करणार नाहींत. बापाची पुत्रवात्सल्याची आशा आतां तूंच आहेस. कुंवरबाई! धीर धर. तुझा व तुझ्या निर्मल दिव्य-प्रेमाचा विजय होणार नाहीं काय? त्याच्या अंतःकरणां-तील स्नेहांकूर अगदींच नाहींसे होऊन गेले काय? नाहीं, कुंवरबाई नाहीं, त्यांच्यांत मनुष्यत्व आहे. तूं आतां त्यांचें एकुलतें एक अपत्य आहेस, त्यांची आशा, त्यांचें प्रेम—त्यांचा संसारिक स्वार्थ, हे सर्व तुझ्यांत एकवटले आहेत, तूंच आतां आंधळ्याचे डोळे, पंगूचे पाय आणि त्यांच्या जीविताची दोरी आहेस. तुझ्याशिवाय हा संसार मेहेताजींच्या मनाला आतां निर्जन वनासमान आहे; ते तुझ्यामुळेंच संसार—जालांत गुरफटले आहेत. कुंवरबाई, लवकर आटोप, यादी आण, मेहेताजी सोहळा करण्यास तत्पर आहेत. कुंवरबाई उठली, तिनें यादी आणली व मेहेताजीनें आशिर्वाद दिला. दारिद्र्याच्या दुःखांत कसा शान्तिदायक उपाय! मेहेताजी, काय तुमचें धारिष्ट, काय तुमचा आत्मविश्वास! कुंवरबाईच्या सासुरवाडची प्रति-कूलता, माहेरी निर्धनता, तिचा नवरा आईचा लाडका, ह्या सर्व गोष्टी असतांना मेहेताजींचें मन शांत होतें. जसजसा विपत्तीचा वर्षाव होत गेला तसतसें मेहेताजींचे गुणकुसुम अधिकाधिक प्रफुल्ल होत गेलें. संकटरूपी सैन्याच्या जबर हल्ल्यामुळें मेहेताजींचा हृदयदुर्ग अधिका-

धिक मजबूत होत गेला. जसजसें त्यांचें दुःख वाढत गेलें, तसतशी त्यांची विरक्ति विशेष प्रौढ होत गेली. त्यांची अंतःशुद्धिहि वाढत गेली, व त्यांच्या भक्तिरसाची भरती होत गेली. समारंभाचा दिवस आला. कवी प्रेमानंद व मेहेताजी स्वतः वर्णन करतात, त्याप्रमाणें स्नानविधि करण्याचा वेळ झाला. विहिणीनें आंघोळीस पाणी दिलें तें अत्यंत उन्ह होतें. मेहेताजींनीं मेघ मल्हार राग गाइला आणि जलवृष्टि झाली. मुलीच्या घरीं मेहेताजींना स्नान कां करावें लागलें तें समजणें शक्य नाहीं. पण त्यांनीं पुरुषोत्तमाचें ध्यान केलें आणि ते त्याच्यांत निमग्न झाले. सर्व सोहळा फार थाटानें पार पडला, आणि मेहेताजींची अब्रू वाचली. जे जे लोक मेहेताजींचें हंसें करण्याचा प्रयत्न करीत होते, त्यांनां त्यांनां मेहेताजींच्या विजयचंद्राच्या उगम पावण्यानें खालीं पाहण्याचा प्रसंग आला. मेहेताजींच्या या संसारांतील कार्यांची इतिश्री झाली. त्यांनीं संसार सोडला. उठा भक्तराज, भक्तींत पुन्हा प्रवृत्त होऊन जा.

## भक्तीपरिक्षेचीं उदाहरणें.

मेहेताजींच्या भक्तीची परिक्षा अनेक प्रसंगीं झाली आहे. आणि त्या गोष्टींच्या उदाहरणांदाखल हुंडीबद्दलची प्रख्यांत असलेली कथा लक्षांत ठेवण्यासारखी आहे. एकदां असें झालें कीं, जीर्णदुर्गांत कित्येक यात्रेकरू वाट चालत

आले. त्यांचा द्वारकापुरीला जाण्याचा विचार होता. त्यांच्याबरोबर सातशें रुपये होते. त्याच्याकरितां एक हुंडी लिहून घेण्याच्या विचारानें ते नागरवाड्यांत हिंडू लागले. कोणी कुचाळ नागरानें त्यांना नरसीमेहेताचें घर दाखवून म्हटलें कीं, त्या घराचे मालक परदेशच्या हुंड्या लिहितात. या सूचनेवरून ते साधू मेहेताच्या घरीं गेले आणि त्यांना हुंडी लिहिण्याबद्दल त्यांनी विनंती केली. मेहेताजी समजून गेले कीं, कोणी माणसानें आपली ही टवाळी केली आहे. परंतु, त्यांनीं त्या साधूंचा आदर-सत्कार करून त्यांना हुंडी लिहून दिली. ज्या शेठजीला हुंडी लिहिली होती त्या शेठजीचें नांव ' शामलशाह मुरली-धर वनमाली ' असें होतें. साधू ती हुंडी घेऊन द्वारकेला गेले आणि शेठजीच्या शोधास लागले. पण तो शेठजी तर सांपडेना. साधू घाबरले आणि पुनः जीर्णदुर्गास जाण्याचा विचार करूं लागले. इकडे मेहेताजींनीं श्रीकृष्णाची स्तुति अशा भक्तिभावानें केली कीं, शामल-शेठला व्यापाऱ्याच्या वेषांत आल्याशिवाय गत्यंतरच राहिलें नाहीं. साधू चौकांतून परत जात आहेत तोंच शामलशेट त्यांना भेटले आणि त्यांनी हुंडी घेऊन सातशें रुपये व वरती थोडी दक्षणा देऊन त्या साधूंनां संतुष्ट केलें. हा अद्भुत वृत्तांत इतका लोकप्रिय झाला आहे कीं, प्रेमानंद कवींनीं त्यावर एक सुंदर हास्यरसप्रधान काव्य लिहिलें आहे.

अशा प्रकारच्या मेहेताजींच्याविषयीं अनेक दंतकथा चालत आल्या आहेत. त्या सर्वांत मांडलिक राजाच्या वेळीं घडलेली हारप्राप्तीची कथा विशेष चित्ताकर्षक आहे. जुनागडचा राजा मांडलिक शिवभक्त होता आणि नरसिंह मेहेता विष्णुभक्त होते. राजाच्या दरबारांतल्या लोकांनीं त्याला चिथविलें कीं, नरसिंह वैष्णव असून शिवधर्मीयांचा द्वेष करणारा आहे. श्रीकृष्णाचें नांव घेऊन बायकाबरोबर तो गातो, नाचतो आणि अनेक प्रकारचे विहार करितो. या गोष्टीवरून राजानें असें ठरविलें कीं, मेहेताजींना जर श्रीकृष्णभगवानांचे हातची माळ मिळूं शकेल तरच त्यांना भक्त मानावें, नाहींतर त्यांचा प्राण घ्यावा. मेहेताजी शेवटीं विजयी झाले आणि दरबारांतल्या लोकांचीं तोंडें म्लान होऊन गेलीं. या सर्व वृत्तांताचें वर्णन मेहेताजींनीं आपल्या 'हारमाळा' नांवाच्या काव्यांत केलें आहे. त्याचें आपण या पुढें सविस्तर विवेचन करणार आहोंतच म्हणून येथें संक्षेपानें तें संपवीत आहों. ही नरसिंह-विजयाची कथा खरी असो किंवा खोटी असो, पण असे दैवी चमत्कार केवळ असत्यच असतील असें कसें म्हणतां येईल? असत्य कधींही चिरकाल टिकत नाहीं. केवळ हवेंत किल्ले बांधणें शक्य नाहीं. दंतकथेचें रहस्य जाणण्या-साठीं जर आपण त्यांना तावून सुलाखून तपासलें, तर आपणाला सहज समजून येईल कीं, त्या कथांचें आदिस्थान

निर्मल आणि शुद्ध असून सत्यानें परिपूर्ण आहे. त्या कथा महात्म्याच्या हृदयांत राहिलेल्या परमकल्याण, परमसत्य आणि परमसौंदर्याच्या अंशाचें आपल्याला भान करून देतात. या सर्व कथा मेहेताजींच्या मन, वचन आणि कर्म यांचें सर्वोत्कृष्ट तेज दाखवून देण्याच्याकामीं अतिशय उपयोगी आहेत. त्या सर्व गोष्टी आपल्या ज्ञानेंद्रियांपुढें एक प्रकारचें अतिशय मोहक चित्र उभें करतात आणि आदरभावानें युक्त अशा गांभीर्याची छाप आपल्या मनावर ठसवून देतात. दंतकथा ही महान् पुरुषांचें स्मरण करविणारी, त्यांच्याबद्दलच्या आपल्या प्रेमाचें पोषण करणारी, शोकभयाच्या समयीं आपल्या निराशेनें व्याप्त झालेल्या मनाला उत्साह देणारी, परम आशयाचें दर्शन करविणारी, प्रेमयुक्त आदरभावाचें पोषण करणारी, स्वदेशाभिमानाची अभिवृद्धि करणारी आणि मनुष्याला मनुष्यत्वाचें शिक्षण देणारी महादेवी आहे. भूत आणि वर्तमानकालच्या मधील संबंध जोडणारी ती सांखळी आहे.

## मेहेताजींची कविता व प्रेमभक्ती.

मेहेताजींची काव्यशक्ति कशी आहे, म्हणजे त्याचें रसज्ञान, त्यांची कल्पकता, त्यांचें बुद्धिचातुर्य इत्यादि कवीला अवश्यक असणारीं जीं साधनें तीं त्यांना कितपत अनुकूल आहेत, या विषयाकडे आतां आपण वळूं. त्यांच्या कवितांचा काय उद्देश आहे याचाहि आपल्याला

विचार करावयाचा आहे. गुर्जर वाङ्मयाच्या दिव्य प्रभेंत मेहेताजींची कविता झळकत राहिली आहे. अंतःकरणांत आनंदलहरी उत्पन्न करणारे विचार आणि भाव त्यांनीं सहज स्फूर्तीनें प्रकाशित केले आहेत. गुर्जर कविमंडलांत कालानुक्रमाप्रमाणें ते आद्य कवि असून त्याची भाषा व शैली प्राचीन काळाला व परिस्थितीला अनुरूप अशी असेल, ह्यांत कांहीं आश्चर्य नाहीं. मेहेताजींच्या पूर्वी कोणी कवी नव्हते असें नाहीं, पण मेहेताजींच्या अगोदर ते प्रसिद्ध नव्हतेच. कवी म्हणून त्यांतील कोणीही विशाल कीर्ति मिळविली नाहीं. मेहेताजी आद्य कवि गणले गेले आहेत ते त्यांच्या उच्च कवित्वामुळें व त्यांच्या लोकप्रसिद्धीमुळेंच. ते आदर्श कवी आहेत. विहार वर्णन, भक्ती, उपदेश व ज्ञानरूपी पल्लवांनीं त्यांची कवितावेली सजलेली आहे. जरी ते कविश्रेष्ठ नसले तरीपण, आद्य कवींत व अनन्य भक्तांत उच्चपदामुळें त्यांचें नांव अलंकृत झालें आहे. मेहेताजींचा मुख्य विषय निष्काम प्रेमभक्ती हा आहे. ते भक्तीच्या पक्षाचे समर्थक आहेत. प्रेमकाव्याचे ते जनक आहेत. श्रीकृष्णाच्या रासक्रीडेचें वर्णन करण्यांत त्यांनीं आपल्या विशाल कवित्वशक्तीचा योग्य उपयोग केला आहे. प्रेममग्न नरसिंह मेहेतानीं या कवितेंत कित्येक ठिकाणीं अंतर्दाहाचे उद्गार व कांहीं ठिकाणीं मधुर, कोमल, शब्दग्रथित वाक्यांचा उपयोग केलेला आहे. तें काव्य प्रेमळ वाणीनें

ओतप्रोत भरलें आहे. संसार–माधुर्याच्या रसानें ते रसभरित झालें आहे. शब्दाच्या शेवटीं येणाऱ्या मृदुता सूचक स्वरानें तें दुमदुमून राहिलें आहे. रास आणि क्रीडेचें वर्णन करण्यांत स्त्रियांना साजेल अशा कोमलतेचें आणि सहृदयतेचें अंकुर त्यांच्या कवितेंत स्पष्ट दिसून येत आहेत. नरसिंह मेहेतांनीं शृंगार, भक्ती, बाललीला, सुरतसंग्राम, चातुर्य, रासांचीं पदें, शामलदासाचें लग्न, नरसिंह विलास, गोविंद गमन, चातुर्य छत्तीसी, शृंगार-माला, वसंत विलास, पाळणें आदिकरून अनेक विषयां-वर आपली कवित्व शक्ति उपयोजिली आहे. “ प्रेमनो करनार पात्र शुं, तन मन प्राण त्यां मेले सोंपी ” या सिद्धांताला अनुसरून मेहेताजी शुद्ध आणि सरळ भक्तीनें तपारंभ करून आपल्या आत्म्याला रसानें उद्भवणाऱ्या मूर्च्छेच्या बलेंकरून मूढ बनवून, प्रेमाच्या खोल आणि अनंत सागरांत झोंकून देत आहेत आणि तेथून ज्ञानामृतानें आपल्या तृषेला तृप्त करून पुनः परम शांति पावत आहेत. त्यांच्या दृष्टीनें जगतांत कांहींच खरें नाहीं; जें खरें आहे तें प्रेमच आहे. प्रेम, प्रेम आणि प्रेम, हेंच त्यांचें ध्येय आहे. जर त्यांनां कांहींहि प्रिय असेल तर तें “ केसर भीना कहानजी, कसुंबेभीनी नार ” “ लोचन भीनां भावसुं, उभा नंदद्वार ” च आहे.

मेहेताजी स्वतःच गोपी आहेत. आणखी,

" चंद्र विंटयो जेम चांदरणीए, तरुवर वींटयो वेलीरे "
" गोविंद वींटयो गोवाळणीए, हसागवनी हेलीरे "

असें त्यांचें अभेद प्रेम आहे. पतिपत्नीमध्यें जशी भक्ति असते तशी भक्ति त्यांनीं आपल्या काव्यांत प्रगट केली आहे. प्रेमसागरांत पोहत असतांना मेहेताजींनीं कृष्णलीलेचें चित्र फारच कुशलतेनें चितारिलें आहे. श्रीकृष्ण आणि गोपीमध्यें खेळलेला रास, परमात्मा आणि त्यांच्या अनुभवज्ञानासाठीं झटणारा आत्मा याचें रूपक काव्य आहे.

" वांसळी वाहेरे, वाहेरे, मधुरे गाये कहान; "
" सुरसुरने शब्द नानाविध, राग रागणीने तान. " १
" अहा तत ता थई रे , इहां त न न न हीरे ; "
" इहां मोहोमांहेरे , माननी राखे संग "
" गुगणण गगगण उंपग वाजे, तालीनी शंखमृदंग. " २
" ईहां रमझम रमझमरे, ईहां झांझर झमकेरे; "
" ईहां ठम ठम ठमकेरे. ईहां विजळीश चमकेरे; "
" ईहां थमथम थमकेरे, काने झबुके झाळ; "
" एकने दे आलिंगन, चाले मधुरी चाल. " ३

असें वृंदावनांत खेळणाऱ्या रासा विषयीं मेहेताजी " दीवटी पोरे दीवटीयो, नारसैंयो हरीनो दीवटीयो " दासी रुपानें होऊन राहात आहे; अर्थात् मेहेताजी भेद-भाव विसरून जात आहेत. या रासांत—भक्तीरसांत गोपी आत्मे " लोट पोट " होऊन जात आहेत.

"एहनी एहने एज शोभा."

हरीच्या बरोबर प्रमदा "थय थय थय थयकार" करीत आणि मधुर गान गाऊन रासांत निमग्न होऊन जात आहेत. हरी जसा बासरी वाजवीत आहे, तशा त्या सुंदरी नाचत आहेत, मोहन मुरलीचा मधुर नाद त्या अखिल अरण्याला गजबजून टाकित आहे, आणि तो 'सप्तसुर धुनी, गगन चाली" जात आहे. तो चित्ताकर्षक नाद प्रमदांचीं अंतःकरणें थरारून सोडीत आहे. आणखी-

"रास रमतां रढीयाळे वहाले, कीधुं अंतर ध्यान रे;"
"मारी निर्मळ करवा कारण, मुकाव्युं अभिमान रे."
"व्याकुळ वनिता थई सहु अंगे, क्यां गया प्राणजीवन रे."
"द्रुमलताने पुछीने वळीयां, जोयुं सघळुं वन रे."
"वळवलता हींडे वनमाहे, आव्या अंतर जामी रे;"

अशा रितीनें हरी एकदम अदृश्य होऊन जात आहे. हरीला शोधण्याकरितां त्या गोपी अरण्यांत भ्रमण करीत आहेत, पण, हरी सांपडत नाहीं; फक्त अदृश्य ठिकाणाहून मुरलीचा नाद ऐकूं येत आहे. त्या वेड्या-"मुरलीनें भारल्या गेलेल्या गोपी"—चारी दिशेला शोधार्थ भटकत फिरत आहेत, तरी कृष्ण सांपडत नाहीं. त्यांची उत्कंठा अधिक वाढत जात आहे. शेवटीं पुन्हा हरीची भेट होत आहे. तेथें जितक्या गोपी आहेत तितक्याच रूपानें हरी प्रगट होत आहे, आणि नंतर, "एक थईआ वीसरीऊ नखे, कोय कहेने नव जाणे" अशा रीतीनें स्वर्गसुखाचा

ाभ घेत असतां " शोभा सागर सामळीया " च्या
ाजलांत बुडून जात आहेत. याप्रमाणें अनंत रास खेळ-
व जात आहे आणि " सुखसागरो लेहरे " भक्त
ळकतच जात आहेत. अर्थात् ज्ञानाभिलाषी भक्त ईश्वर
ला अवलोकून ईश्वर काय आहे आणि कोठें आहे, तें
णण्याकरितां झटत आहेत. परमात्मा लवकर सांपडत
हीं. परंतु निराश न होतां ते आपले प्रयत्न चालू ठेवित
ाहे आणि शेवटीं ते ज्ञानसुधा पिवून तृप्त होऊन स्वतः
मात्माशीं संयुक्त होत आहेत, आणि ' अहं ब्रह्मास्मि '
शा अभेद्य ज्ञानाची प्राप्ती करून घेत आहेत. हा प्रकार
खंड चालूच आहे आणि हरीची रास क्रीडा सतत
लूच जात आहे, असा याचा अर्थ आहे.

याशिवाय मेहेताजीकृत " सुरत संग्राम " नांवाचें
ाव्य पण प्रसिद्ध आहे. त्या काव्यात त्यांनीं श्रीकृष्ण
राधा यांमधील चाललेल्या युद्धाचें वर्णन केलें
ाहे. श्रीकृष्ण आणि राधा या दोघांत असें ठरलें कीं, जो
ल त्यानें दुसऱ्याचें दास्यत्व स्वीकारावें. मेहेताजी
तः त्या युद्धांत दूतीचें कार्य बजावीत आहेत. गोप
ं एकत्र होऊन कृष्णाला म्हणतात कीं, बायकांच्या
ोबर युद्ध करणें हें ठीक नाहीं. कारण कीं;

" जीतिए जस नहि, हारे अपजस सही,
बांडीया सपेने बचवुं शेमां ? "
" मळी तेग मारवी, महिला हरावबी,
ने कीडियां उपरे कटक जेवी. "

भगवान श्रीकृष्णानीं तें ऐकलें नाहीं, व " स्त्रीपुढें नमणें हें नीच कर्म " असें सांगून युद्ध करण्याचा निश्चय त्यांनीं केला. मग युद्धसामुग्री तयार झाल्यावर तें अखिल गोपसैन्य ' रणभूमी ' कडे जाण्याकरितां निघालें. ह्या सैन्याचें वर्णन देतांना कवी म्हणतात कीं,

"गोळी ने गोफणी,
पाश लीधो वणी गेंडीने गेंड संभाळी सारी; "
" कवच धरी कारमां,
चालिया हारमां, सेनापति अग्र समग्र मांही. "
" शंख शृंगीरणे, भेरीओ भणभणे,
उरग उरवी उगे सैन्य साजे, "
" सैन्यशुं रामनुं, कार्तिक स्वामनुं,
सुरेन्द्रनुं सेन ए देशी लाजे. "
" नदी पुरे चढी, जाय मळवा दडी,
तेम कहाननुं लश्कर बने गाजे; "
" किरण गणे कोई, बिंदु गणे जोई,
नरसैयो न गणे कोई समाजे. "

असें गोपसैन्य अवलोकून स्वामिनी आपल्या सहचारींनां म्हणाली कीं:-

" शस्त्र सजो सखी, सैन्य भारे लखी,
कटो सिंहनाद ए सुणे एवो; "
" बरकीने बोलियां, तोळने तोलियां,
छल्या सुणी स्वर्गना देवदेवो; "
" ब्रम्हांडने चीरियुं, वितने पुरियुं,
सिंहनादे फाटयां सत्प सेवो; "

" नबेलो भागिया, मळमूत्र त्यागिया,
केहि सुणो शब्द नहि गोपीजेवो. "

याप्रमाणें उभय पक्ष युद्धाकरितां आतुर झालें आहे; परंतु कृष्णाच्या पक्षाची एकदम युद्धांत शिरण्याची इच्छा नसल्यामुळें त्यांनीं जयदेव दूताला सलोखा करण्याच्या हेतूनें राधिकेजवळ पाठविलें. राधिकेनें जयदेवाला घाबरून टाकिलें आणि तो बिचारा फार मुष्किलीनें कृष्णाजवळ परत पोहोंचू शकला. आपल्या दूताचा असा अपमान झालेला पाहून " कटक कृष्ण सजी पंथ लीधो. " आणि कवि रौद्ररसाचें वर्णन देतानां म्हणत आहेत:—

" सैन्य जे गोपनुं, चालियुं ओपतुं,
ते समे सप्तग्रह युद्ध करता; "
" पृथ्वी चलित थई, अशनि पडती तहीं,
वरसता उलका प्राण हरता. "
" शांति गई वस्तिनी, वृष्टि थई अस्थिनी,
वायु भयंकर त्यारे वातो; "
" प्रकाश दिशा तणो, श्याम दीसे घणो,
संघ सारंगनो सव्य जातो, "
" भूत गण आवता, डाकिनी लावता,
शब्द उल्लूकनो कान पडियो; "
" वारि प्रवाह जे, दर्शाए लाल ते,
सिंहनी संग सारंग लडिओ, "

आतां युद्धाचा आरंभ झाला आणि,

" तारने न भल्यां, भीलमीले भल्यां,

मकराकृतिव्यूह श्रीकृष्णे रचियो; "
" राधिका ते समे, चिंतने केम नमे,
नागाकृति व्यूह सन्मुख सजियो. "

परंतु राधिका कांहीं झालें तरी स्त्री होती; आणि स्त्री जातीस योग्य असें मार्दव, दया तिच्या अंगी होती; म्हणून तिनें युद्ध करण्यास अनमान दर्शवून कृष्णाला निरोप पाठविला कीं:—

" तुज मुज कारणे, बहु पडे धारणे,
महीष लढये उयम वृक्ष भाजे, "
" वांक छे ताहरो, कांईक छे माहरो,
अन्यने दु:ख कहे केम छाजे ? "
" आपण बे मळी, युद्ध करवुं भळी,
हार खाए तेमो पक्ष लांजे. "

❀ ❀ ❀

नंतर द्वंद्वयुद्ध करण्याच्या मागणीचा स्वीकार श्रीकृष्णांनीं केला, आणि खरोखर युद्ध झालें. त्या उभय सैन्याच्या मध्यें:—

" रम्यौ नरसैं बहु, धुमी गणतो सहु,
झुमी झझुमी करे मारमार. "

शेंवटी:—

" जेम यज्ञनी वेदीने, नीसरे भेदीने,
अभ्र छेदीने आदित्य दरशे "
" तेम कृष्ण परमात्मा, भेदीने आतमा,
तीर धरी " वीर वरसे रे हरषे, "

आणि:—

“ पडी गई बालिका, मल्ल जशी मालिका,
राधाए जहीं तहीं शोक दीठो;

❀ ❀ ❀

“ राधे पडी घणेमां, नहि कोई शणेमां,
हर्ष करबा तहीं गोप भाता; ”

❀ ❀ ❀

“ भृंग अरविंदने, चुसे मकरंदने,
हरि हरिवदनीने तेम ताणे; ”
“ सिंहना करविषे, मृगालि जेवी दिसे,
तेवी अबला दिसे युद्ध राणे, ”

राधिकेला अशा रीतीनें पडलेली पाहतांच दुसऱ्या सर्व गोपींनीं तिला बचावण्यासाठीं समरांगणीं उड्या घातल्या, परंतु:—

“ एक जे मरणियो, नहि कोई शरणियो,
तोय ते कईकना प्राण लेतो. ”

तरी श्रीकृष्णाला कशाचीच दिक्कत वाटली नाहीं, आणि युद्धांत दंगच होऊन राहिला. राधिकेला मदत येऊन पोहोंचली; त्या योगानें नंतर घनघोर युद्धास सुरवात झाली; आणि राधिकेच्या तीक्ष्ण बाणाच्या प्रभावानें कृष्णाला मूर्च्छा येऊन तो पृथ्वीवर पडला. नंतर सर्व गोपी एकत्र होऊन त्यांनीं विचार केला कीं, “ समय आई सांकडो, मूकिए आंकडो; ” नाहींतर यांतून बचावण्याचा उपाय नाहीं. सर्व गोपाळ कृष्णाला उचलून हळूं

हळूं पाठीमागें पाय घेण्यास लागले. या गोष्टीची राधि-केला बातमी लागतांच ती गोपाळांच्या मागोमाग आली, गोपाळ कापायला लागले, ती वीरपुत्री–

" स्तंभन धरी धीर, ताकति ते तीर,
मारंति कंई वीर, मनमां उल्हाशी. "

" लागंत तैं तीर, भागंत आहीर, त्यागंत शरीर कंई वीर मोय्य;
जे हुता मातिया, दशवीरा साथिया, ते पड्या पृथ्वीमां जेम सोटा."

कृष्णाला घेऊन गोपाळ तर पळाले आणि गोपी निराश होऊन गेल्या व युद्धाच्या शेवटीं ते:––

" जीती रणधीरने, वीरना वीरने, चालिया नरसैंया डेरडेरां. "

या प्रमाणें सुरत संग्राम नांवाच्या काव्याची समाप्ति होत आहे. गोपी गोपईशाला जिंकित आहेत–भक्तिपरायण आत्मा प्रेमयुद्ध करीत असतां परमात्म्याच्या अखंड आनंदरूपाला मिळतो. मेहेताजीचें हें काव्य पण एक रूपक आहे. भक्त आणि देव, पतिपत्नी रूपानें त्यांनीं वर्णिले आहेत. भक्त ही अभिसारिका नायिका आहे. ती पतीच्या शोधासाठीं निघते आणि शेवटीं त्याची भेट झाल्यावर त्याला वश करून घेते. या काव्यांत जरी मेहे-ताजींनीं लोकाचाराविरुद्ध असे शब्द व व्यंगार्थानें युक्त अशीं वाक्यें यांचा उपयोग केला आहे, तरी पण, हा त्यांचा दोष त्यांचा भक्तिरसाच्या अतिरेकामुळें एका बाजूला ठेवून देण्यासारखा आहे. नरसिंह मेहेता स्वतःच त्या काव्याच्या शेवटीं म्हणतात कीं:––

"छे दोष दरीयाव, पण गायन मांच, करिये भाईराव नमन बहु ने"
"अपभ्रष्ट गिराविषे, काव्य केवुं दिसे, गाय दिसेने ज्यम ती लागे;"
" तेभां कोपिद कविनहि, वातकई नवि नहि,
भक्त अनुभवी नहीर आगे."
" बास वसवा नहि, साधन पास नहि,
बळी कृष्णने दास थई, उलटे भणवुं;"
" नागरवट नहि, कंई खटखट नहि,
एक धरी दढ हरिध्यान करवुं."

अशा प्रकारची त्यांची "उलटी" आणि "हट्टी" असून ते जरी कांहीं दोषाला कारणीभूत असले, तरी ते क्षम्य आहेत.

हारमाला

" लंपट मेहेतो लंपट नाहीं, लंपट रंगे राचे;"
" लंपट थई हाथ कोटे, मेहेले लंपट थईने नाचे."

असें अतिशय निंदायुक्त व तीव्र शब्दांनीं ठेवण्यांत आलेल्या आक्षेपांतून नरसिंह मेहेतानीं पूर्णपणें मुक्त होऊन परमकीर्ति कशी संपादन केली, या वृत्तांतावर हें आख्यान लिहिलें आहे. हें काव्य संवत १४६२ त चैत्र महिन्याच्या शुक्ल पक्षाची सप्तमी तिथीला व सोमवारी नरसिंह भक्ताच्या हातून लिहून पार पडलें. सुराष्ट्राचे भूपति राजे मंडलिकाच्या राजसभेंत मेहेताजीच्या प्रतिपक्षानें त्यांच्याशीं वाद केला होता, आणि त्या ठिकाणीं त्यांच्या भक्तिची परिक्षा झाली होती. या हारमाला काव्याची पूर्तता ज्या दिवशीं झाली, त्याच दिवशीं मेहेताजीनीं हरिकीर्तन करण्याचा पाया घातला. त्याच दिवशीं संवत १५१२ त

त्यांनीं हरिकीर्तनाची समाप्ति करून आपलें भक्तिभुवन नखशिखांत रचन ठेवलें, असें त्यांच्या हारमालेच्या दोन निरनिराळ्या पदांवरून समजून येत आहे !

## हारमालेचें ज्ञान.

याबद्दल अशी दंतकथा आहे कीं, राजा मंडलिकाचा प्रधान प्रळंब यानें मेहेताजीला राजमंदिरांत बोलाविलें आणि त्यांच्या बरोबर त्यांची भक्ती सिद्ध करून देण्याच्या हेतूनें संन्याशांच्या द्वारां वादाला आरंभ केला. सभा मेहेताजीला सांगू लागली कीं, तुम्ही आपला " वैष्णव धर्म " सोडून द्या. मेहेताजी त्यांना उत्तर देतांना म्हणाले कीं:—

" ए वेडो हवे हुं नव मेलुं.........."

अशा रीतीनें उभयपक्षांमध्यें वादास आरंभ झाला. प्रश्नोत्तर परंपरेच्या मालिकेंत भक्तिपरायण मेहेताजींनीं, निष्काम भक्तीच्या उद्गाराशिवाय एकहि वादात्मक वचन काढिलें नाहीं. राजा मंडलिकाचें अश्रद्धामय हृदयांत असलेल्या क्रोधाग्नीचें उष्ण प्रमाण हळूं हळूं वृद्धि पावलें. त्यानें अशी आज्ञा केली कीं, मेहेताजींनीं येथें एकत्र केलेल्या सर्व साधु संन्याशांबरोबर वाद करावा आणि त्यांचा त्यांत जर पराभव झाला, तर त्यांनीं वैष्णव मार्गाचा त्याग करावा. मंडलिकाच्या दरबारांत सर्व पंथाच्या साधूंना बोलाविण्यांत आलें. दरबार भरला, राजा प्रधान आदिकरून सर्व सभाजन आपापल्या आसनावर विराज-

मान झाले. संन्यासी पग आपापल्या आसनावर उपविष्ट झाले; राजमंदिराच्या बाहेर सुराष्ट्राच्या उत्सुक प्रजेचे थवेच्याथवे उभे राहिले, मेहेताजी आपल्या शिष्यमंडळा-सह एक लहानसा पक्ष करून त्या सर्वांच्या मध्यें एकाग्र-चित्त करून श्रीकृष्णाचें ध्यान करून उभे राहिले. रघुनाथा-श्रम नांवाचा साधु मेहेताजीला म्हणूं लागला कीं:—— ' मेहेता, माग, माग रामजी पासे हार. " मेहेताजीनीं कृष्णभक्त या नात्यानें उत्तर दिलें कीं:——

" राम कृष्णमां अंतर शानो, ज्ञान तारुं क्यां नाठुं ? "

रंगीला, छबीला, छोगाला, " कृष्ण सेव्याविना, भागे नाहि कांई भय. " या प्रमाणें नरसिंहाश्रम, अद्वैताश्रम, इत्यादि सर्व साधु मेहेताजींच्या प्रेमदुर्गावर शब्दरूपी गोळे टाकूं लागले; पण मेहेताजीच्या दुर्गाचा एकहि खडा पडला नाहीं. मेहेताजींना ते संन्यासग्रहण करण्याचा उपदेश करूं लागले. त्यांना उत्तर देतांना तो रसिक भक्त म्हणतो कीं:——

" मुंड मुंडावी टोपी घाली, एम न थईए वेरागीरे ; "
" अमो छुं वैष्णव छेलछबीलाना, ते साथे लगनी लागी. " मुंड०
" ममता भागी ते वेरागी, अनहदशृंगी वोलेरे; "
" भेख धरीने द्वेष करे तो, जोगी असुरने तोले. " मुंड०
" संसार वेवार सर्वे साचवियें, विकारथी वेगळा रहियेरे ; "
" सर्व भूत सम दृष्टे पेखे, तेने विरागी कहिये. " मुंड०

" अभिमाने तें तो सुकृत खोयुं, प्रीतरंग नथी छाप्योरे; "
" भणे नरसैंयो भेख तजीनें, पहेरनें पचवस्त्रनो वाघो. " मुंड०

संन्याशी अधिकाधिक क्रोधभरित झाले. मेहेताजींनीं हार मिळविण्याकरितां श्रीपरमेश्वराचें स्मरण केलें. जेथें विश्वास आहे तेथें विश्वंभर आहे, या वचनावर त्यांचा सर्व आधार होता. भक्ती केल्यानें भवसागर तरूं शकतां येईल, असें त्यांचें मन त्यांस सांगत होतें. " जटा धरे जगदीश मळे तो, वड वैकुंठ चालेरे " असें वाक्य बोलून ते टिळेटोपी करणाऱ्या संन्याशांची धूळ झाडून टाकूं लागले. संन्याशी मेहेताजीकडे पाहून हसूं लागले व त्यांच्याशीं वाद करूं लागले. मेहेताजी आपल्या प्रेमभक्तीच्या प्रवाहांत पोहत होते. " परमेश्वर " हार देतानां उशीर करीत आहे, हें पाहून मेहेताजींच्या हृदयक्षेत्रांत निराशा डोकावूं लागली. " हे हरि ! तारे भरुंसें वळुंध्योरे, हुं तो तारे भरुंसे वळुंध्यो रे " या शब्दांनीं ते म्हणूं लागले कीं, " जो मारा कर्मने भुलीश तुं भूधरा, पतितपावन तारुं बिरद जशे. " नरसिंहाश्रम नांवाचा संन्याशी मेहेताजींवर अनेक प्रकारचे आक्षेप ठेवित होता. मेहेताजींचा काय उपाय ! ते ज्ञानी होते, मनुष्याच्या मूर्खत्वाचें त्यांना ज्ञान होतें म्हणून, ते उपदेशात्मक वाणीनें अशा मूर्ख अज्ञानी संन्याशांची समजूत घालीत कीं:—

" अळगो छे सर्वथी, सर्व मध्ये सदा,
ते अल्प बुद्धिने घटकेम आवे ? "

अशा रितीनें संवाद चालला होता. मेहेताजींचा " सावळिया " त्यांची स्तुती ऐकत होता. जसा संन्याशांचा जय होत गेला, तसतसें मेहेताजींचें धैर्य खचत गेलें. शेवटीं, राजा मंडलिक " तरवार काढून हरीजना " वर चालून आला, आणि मेहेताजींचा प्राण घेण्याला तयार झाला. राणीनें येऊन राजाचा हात धरला आणि भक्तराजाला वाचविलें. राजा मंडलिकाची आई सभामंडपांत येऊन राजाची कानउघाडणी करून म्हणाली कीं, " दुष्ट बनी वैष्णवने पीडे, जावाना ढंगजी. " पण राजाच्या ध्यानांत ही गोष्ट आली नाहीं; आणि नरसिंह हार मिळवील तरच तो बचेल, असा तो आग्रह धरून बसला. मेहेताजींना कारागृहवासी व्हावें लागलें. सभा हाराची वाट पहात बसली. हार मिळाला नाहीं, आणि मंडलिकानें मेहेताजीला एका हत्तीच्या पायाखालीं चिरडून मारण्याची आज्ञा केली. यासमयीं मेहेताजींच्या श्रद्धेंत कांहीं न्यूनता आली. स्वत: संसारी होते म्हणून, संसाराची आठवण त्यांना त्यावेळीं झाली. आपल्या आवडत्या मुलीचें मुख पाहण्याविषयीं ते उत्सुक झाले. या असार जीवनांतून ते आतां मुक्त होणार आहेत असें जाणून त्यांनीं आवडत्या मुलीला उपदेश करण्याचा विचार केला. त्यांनीं मुलीला निरोप पाठवून बोलाविली, आणि ती लाडकी मुलगी—

" रडती आवीरे, ❀ ❀ ❀ जोईने पितानी विपत्ती वेळ; "
" पाय पडीनेरे, रुदन बहु करेरे , जोईने राजाना अवळा फेल. "

भक्तराजांनीं तिला आपल्या जवळ घेतली, व तिला ते आश्वासन देतांना श्रद्धायुक्त, स्नेहपूर्ण, करुणार्द्र भाषेंत बोध करूं लागले कीं:—

" चिंता सोंपारे, श्रीहरिनेरे , करशे भक्तने सहाय. "

आतां तुम्ही तर:—

" सासरे पधारो रे , मारी कुंवरी रे , विपत वेदना विसार; "
" पिपर तमारुं रे पुत्री दुकडुं रे , श्रीगोकुळपति परिवार. "
" तात तमारे, त्रिकमरायजी रे , मात तमारी लक्ष्मीजेह; "
" महीयर तमारुंरे, प्रभुविना को नही रे , तेनी शरण तमारो देह"
" हरिगुण गातांरे , हरखे हींडजो रे, सत संगत शुद्ध विचार. "
" रुदन मा करशो रे , हरजी हसशेरे, नथी कोई आंसुनु लोहनार."
" मुज निरधरनेरे, तुं पेट पडीरे, कंई नव पियरमां सुख; "

मेहेताजींची हीं हृदयद्रावक वचनें आपल्या कानीं पडतांच आपला प्रभाव प्रदर्शित केल्याशिवाय राहूं शकतच नाहींत. मुलीला दिलेलें शिक्षण खरोखर प्रत्येक सद्गुणशाली आर्य बालिकांना मनन करण्या योग्य आहे. " नथी कोई आंसुनु लोहनार " हे शब्द मेहेताजीच्या चिंतेचें चित्र स्पष्टपणें देत आहे. त्यांच्या हृदयांत आपल्या मुलीच्या भविष्याबद्दल काय काय आणि कसकसे विचार आले असतील आणि आले होते, त्या गोष्टींचें ज्ञान आपल्याला त्यांच्या या उक्त पदांतून होत आहे. मेहेताजींच्या हृदय-

सरोवरांतून प्रवाह पावणारे कविताकल्लोलाचे हे वात्सल्य-मय तरंग इतके निर्मळ आहेत कीं, त्या रसांत स्नान करीत असतांना वाचकवृंदांच्या मनोवृत्ती तल्लीन होऊन जातात. अशा रितीनें मेहेताजींनीं आपल्या मुलीला सासरीं पाठविली. मुलगी निरुपायानें प्रभुप्रार्थना करीत गेली. तिचें सखीमंडल कृष्णकीर्तनांत झुलून राहिलें. शेवटीं, " शूरसेनाच्या विनंतीनें " कुंजविहारी गिरीवरधारी प्रसन्न झाले, परंतु त्यांना प्रिय असलेला राग जो केदार, तो जो-पर्यंत भक्त नरसिंह म्हणत नाहीं, तोपर्यंत हार त्यानां देऊं नये, अशी त्यांची आज्ञा झाली. हा केदार राग मेहेताजीनीं धरणीधर मेहेताच्या घरीं " गहाण " ठेवला होता म्हणून, त्यांच्यानीं तो म्हणवला नाहीं. जर साठ रुपये मिळाले तर तो राग सुटणार होता. कृष्णचंद्रानीं त्या रागाला सोडविलें आणि भक्तनरसिंहानीं त्या रागानें " नंदलाला " ला रिझविलें. नंतर, श्रवणीय असा तो सुंदर राग मेहेताजी म्हणूं लागले. गाण्याच्या ध्वनीबरोबर त्यांचा ' पाताळांत ' राहणारा प्रभु पटकन मंडपांत आला आणि मेहेताजीच्या गळ्यांत त्यानें पुष्पमाला घातली. रामानंद मेहेताजीचे सेवक होऊन राजा मंडलिकाला शाप देऊं लागले कीं:—

" धिक् धिक् जिवतर तारूं राजा, धिक धिक तुज पितयाजी; "
" असुर तणे हाथे मरण पायजे, ज्ञार जातना तंनजी. "

* * *

" राज्य तारुं जशे भयराथी, ते दुभ्यो हरितो दासजी; "
" रिद्धसिद्ध संपत तारी जासे, नहि रहे कोई तृणवासजी. "

नरसिंह मेहेतांनीं रामानंदाचें निवारण केलें. मंडालिकाला पश्चात्ताप झाला व मेहेताजींचा विजयडंका चोहीं-कडे गाजून राहिला.

## काव्याचे गुणदोष.

यप्रमाणें ही कथा आहे. मेहेताजींचें हें काव्य त्यांच्या कवित्वशक्तीचा उत्तम नमुना आहे. मेहेताजींनीं जर एखादें काव्य अखंड लहरींत, चटकदार भाषेंत आणि वस्तुविकासाचे अतिक्रमण न करतां लिहिलें असेल, तर हें एकच होय. मेहेताजींची भाषा सरळ, मार्मिक, प्रेमळ, वाक्यांनीं मधुर, सात्विक कोपानें सुडसुडीत, रागाच्या वेळीं रागीट, श्रद्धाभावानें शांत, आणि एकच विचाराचें अवलंबन करून असलेली अशी आहे. " बटकरलडां बोला " कवीचें मर्म त्याच्या वागींत व्यापून राहिलें आहे. त्यांच्या बोलांत त्यांचे हृदय भरून राहिलें आहे. प्रेमाच्या अंतिम प्रदेशांत पर्यटन करणारा त्यांचा आत्मा या शुष्क संसाराच्या कोणत्याहि ठिकाणीं स्थिर राहूं शकला नाहीं. अभिसारिकेच्या चित्तवृत्तीप्रमाणें त्यांच्या सर्व वृत्ती आपल्या प्रिय वस्तूकडे आकर्षिल्या आहेत. " नेहाविना नाथ न आवे " म्हणून स्नेहाच्या सूक्ष्मसृष्टींत ती आपल्या पतीला शोधीत आहे; महत्संकटानें ती आपले मनोरथ परिपूर्ण करीत आहे.

हारमालेचें काव्य रसिक आणि भक्तिभावनेचें दर्शन करविणारें आहे. कित्येक प्रसंगीं, मेहेताजीनीं आपल्या प्रेमाच्या आवेशांत व भक्तीरसाचा घुटका पिवून त्याच्या जोरांत " भगुवा, लबरी, जोगटा " इत्यादि मोठ्या कवींना अनुचित असे शब्द वापरले आहेत. परंतु तसे शब्द त्यांच्या गाढ अनुरागाचें आपणाला स्मरण करवितात. त्यांच्या हृदयवीण्याच्या तारा किती जोरानें कंपायमान होत होत्या त्याचें चित्र आपल्या दृष्टीसमोर उभें करतात. हारमालेच्या काव्यांतील प्रत्येक पद मेहेताजींच्या हृदयाचा उमाळा आहे. वर्षाऋतूंत मेघमालेच्या परस्परांवर आदळण्यानें होणाऱ्या गडगडाटाप्रमाणें मेहेताजींच्या या काव्यांत परस्परविरोधी पक्षांकडील प्रश्नोत्तराच्या परिणामांत होणारी शब्दगर्जना एक प्रकारचें गांभीर्य उत्पन्न करून अभिनव रस उत्पन्न करीत आहे. तो रस प्याल्यानें वाचकही रसमत्त होऊन आपल्या भिन्नभिन्न वृत्ती विसरून जाऊन अद्वैततेला पोहोंचतात.

## हारमालेचा ऐतिहासिक उपयोग.

नरसिंह मेहेताच्या वेळीं जुनागडचे नागर कशा तऱ्हेचा पोषाख घालित होते त्या गोष्टीचें ज्ञान आपल्याला हारमालेच्या एका पदाच्याखालीं लिहिलेल्या एका चरणावरून होत आहे.:—

" अल्या, तूं पाघडी बांधे खूणाळी, झीणा जामाने पटकोरे "

यावरून समजून येतें कीं, त्यावेळीं पुरुष डोक्यावर कोपरे असलेली पगडी घालीत असत आणि अंगांत पातळ पायघोळ आंगरखा घालीत असत. परंतु कोपरे असलेली पगडी आकारांत कशी असेल ते आपल्याला या कालांत निश्चयपूर्वक सांगता येणार नाहीं. जुनागडचे नागर सध्यां ज्या घाटाची पगडी घालतात, त्या घाटाची ती पगडी असेलच, कारण कीं, सध्यां जुनागडांत घालण्यांत येणारी पगडी आकारानें वाटोळी असते.

मेहेताजींच्या वेळीं कृष्णभक्ति फारशी प्रिय नसावी असें अनुमान त्यांच्या झालेल्या अपमानावरून व निंदेवरून निघूं शकतें. त्यावेळचें लोकांचें आचारविचार कसे असतील या विषयावर मेहेताजींच्या हारमालेची कित्येक वाक्यें बरोबर प्रकाश पाडीत आहेत. त्या काळांत जनसमाज साधारणपणें चमत्काराला मानीत नसेल, असें मेहेताजींच्या या काव्यावरून दिसून येतें. राजाच्या मनांत श्रद्धेचा अभाव होता, व लोकांची स्थिति मनांत पण तशीच होती. आणि म्हणून श्रद्धाळू मेहेताजींचा उपहास होत होता. राजा मंडालिकाला रामानंदानें शाप दिला, आणि त्याचा परिणाम तो म्लेंच्छांच्या हातून मरण पावला; ही गोष्ट इतिहासांत नमूद आहे. ह्या हारमाला काव्यांत कित्येक ऐतिहासिक माहिती उपलब्ध होत आहे. त्या काळीं जातिव्यवस्था संपूर्ण रितीनें संभाळण्याकरितां काय काय

करण्यांत येत असे, ते मेहेताजींनीं आचारविचाराबद्दल केलेल्या विवेचनावरून सहज समजून येईल. जातिव्यवस्थेचें पालन करण्यासाठीं अथवा त्या जातिबंधूंच्या तिरस्कारास पात्र झालेल्या त्या भक्तराजाच्या मतांचे खंडन करण्यासाठीं, राजसत्तेचा उपयोग करण्यांत नागर मागेंपुढें पहात नसत, हें पण या काव्याच्या वाचनानें समजून येतें.

## हारमाला आणि गुर्जर साहित्य.

हारमाला काव्याला गुर्जर साहित्यांत कोणतें स्थान मिळालें आहे, या बद्दल आतां आपण विवेचन करूं. हारमाला काव्यविषयीं साहित्यांत एक अति महत्वाचा प्रश्न उभा राहिला आहे; आणि तो हा कीं, हारमालेचा खरा लेखक कोण ? हा प्रश्न उभा राहण्याचें कारण इतकेंच कीं, हारमाला एक अतिशय लोकप्रिय काव्य आहे. या संबंधीं महाकवि प्रेमानंदानें पण थोडेसें लिहिलें आहे. या प्रश्नाचा निर्णय करण्याकडे आतां आपण आपली दृष्टी फिरवूं.

## " हारमाला कोणी लिहिली "

परमात्मा श्रीकृष्णाचें अनन्य भक्त कविवर नरसिंह मेहेता यांच्या चरित्रांत आपण म्हटलेंच आहे कीं, जीर्णदुर्गाचा राजा मंडलिक याजकडून त्यांचा अपमान झाला होता. तो अपमान होण्याचें कारण, ते कृष्णभक्त होते,

हें होय. कृष्णभक्ति अनुपम आहे हें सिद्ध करण्याच्या उद्देशानें स्वयंप्रकाश परमात्म्याच्या मूर्तिवर असलेला पुष्पहार मिळविण्याची, आणि तो न मिळाला तर मरणाच्या शिक्षेला तयार होण्याची त्यांना आज्ञा करण्यांत आली होती. आतां त्या मूर्तिनें आपल्या हातानें तो हार त्यांना घातला किंवा नाहीं, आणि घातला असला तर तो जड पदार्थ चैतन्ययुक्त प्राणासारखें कार्य कसें करूं शकेल, ह्या गुंतागुंतीचा प्रश्न तूर्त एका बाजूला ठेऊन देऊन, आपणाला इतकेंच पहावयाचें आहे कीं, त्या 'हारप्राप्ति' च्या विषयावरील काव्य कोणीं लिहिलें आहे? नरसिंह मेहेतांनीं स्वतः किंवा त्यांच्या भक्तीनें अत्यंत प्रसन्न झालेल्या दुसऱ्या कोणी कवीनें? या प्रश्नाचा निःपक्षपातानें निर्णय करणें, हें कार्य इतकें गहण आणि कठीण आहे कीं, साहित्यक्षेत्रांत फिरणारे विद्वान त्यावर लिहून लिहून थकून गेले आहेत. एक पक्ष, भक्त नरसिंहाचा आहे. दुसरा पक्ष, कविमणी प्रेमानंदाचा आहे. प्रश्न येवढाच आहे कीं, "हारमाला" नांवाचें काव्य, त्यांत वर्णिलेल्या वादांत प्रत्यक्ष भाग घेणाऱ्या व्यक्तीनें लिहिलें कीं, दुसऱ्या कोणी कवीनें लिहिलें! हारमालेंत आत्मप्रतीतीचे उद्गार आहेत, किंवा त्या वादाचें वर्णन करणाऱ्या कोण्या रसिक कवीचे उद्गार आहेत! नरसिंह मेहेता आणि प्रेमानंदभट्ट हे दोघेही कवी होते, ते दोघेही पुष्कळ दिवसापूर्वीं

होऊन गेले. त्यांच्या चरित्राच्या वृत्तांताविषयीं वस्तुतः कांहींही निश्चितार्थानें माहित नाहीं. त्यांतल्या त्यांत प्रेमानंदाच्या चरित्रासंबंधीं आपल्याला थोडी फार माहिती आहे. मेहेताजीच्या वेळीं वाङ्मयांत असणाऱ्या अंधाधुंदीचा लाभ घेऊन मेहेताजींची कृती दुसऱ्या लेखकावर लादली गेली असल्यास, ही गोष्ट पण संभवनीय आहे. या कारणामुळेंच कदाचित मेहेताजींच्या 'हारमाला' काव्याचें उत्पादकत्व भट्ट प्रेमानंदालाहि प्राप्त झालें असेल ! कवी प्रेमानंदाला हारमालेचा कर्ता म्हणण्याला कारणें नाहींत असें नाहीं, परंतु तीं कारणें कदाचित् पूर्वीपासून संशयित झालेल्या मनाचे परिणाम पण असतील ! प्रेमानंदाच्या बाजूच्या कांहीं वाचकाना मेहेताजी विरुद्ध आधार सहज सांपडतील. कोणत्याहि विषयाचें निश्चयात्मक विवेचन करणें हें अत्यंत कठीण कार्य आहे. विवेचकांच्या विचारांत सदोदित सादृश्य असूं शकत नाहीं. त्यांचे प्राथमिक सिद्धांतहि एक असूं शकत नाहींत. त्यांच्या योग्यतेंतही भेद असतो. शिवाय विवेचन करते वेळेस परीक्षकाचें मन समतोल असूं शकत नाहीं; आणि त्याच्या मनाचा कल वळून कित्येक वेळां एकाच पक्षाला लाभ मिळून जातो. या सर्व गोष्टींमुळें त्यांचीं विवेचनें सदोदित खरींही असत नाहींत. इतकें जरी आहे, तरी पण, प्रत्येक विवेचकाला आपले अभिप्राय देण्याला अधिकार असतो, त्याचा लाभ घेऊन असें

म्हणतां येईल कीं, ' हारमाला ' या काव्याचें कर्तृत्व मेहतार्जीना देणेंच युक्त आहे. नरसिंह मेहेतानीं संवत १५१२ त आणि प्रेमानंदानीं संवत १७३४ त अशा दोन वेगवेगळया हारमाला लिहिल्या. मूळ मेहेताजींनीं जी हारमाला लिहिली, ती प्रेमानंदानीं कोणत्याहि ठिकाणाहून मिळविलेली अथवा संभाळून उतरून घेतलेली असली पाहिजे. पाठीमागून मेहेताजीवर काव्यानें मोहित होऊन त्यांनीं आपल्या विशाल कल्पनेच्या बलेंकरून मूळ हारमालेंत थोडीफार सुधारणा केली असावी असें संभवतें. त्या हारमालेंत त्यांनीं कित्येक अभिनव पद्य-कुसुमें गुंफलीं असतील, त्यांनीं कांहीं कारणामुळें आपलें नांव लिहिलें नाहीं, हे खरें दिसत नाहीं. कारण कीं, मेहेताजी संबंधानें त्यांनीं जें जें लिहिलें आहे, तें तें त्यांच्या नांवानें ग्रथित झालेलें आहे. आपण मेहेताजीनां हारमालेच्या लेखकाचा आणि प्रेमनंदाला सुधारणा करणाराचा मा[illegible] देऊं शकूं. कोणाला किती मान द्यावा हें भिन्न भिन्न प्रवृ[illegible]तीच्या मतांवर अवलंबून आहे. हारमाला लिहून अमरत्व पावलेले मेहेताजी गुजराथ देशाचे आद्य कवि [illegible] रूपानें अन्तकालपर्यंत विलसत राहोत, हीच प्रभुजव[illegible] प्रार्थना आहे.

वरप्रमाणें आपण मेहेताजीच्या प्रेमभक्तीच्या काव्या[illegible] त्रोटक विवेचन केलें. आतां त्यांच्या भूपाळ्यांविषयीं

काहीं लिहूं. नरसिंह मेहेताच्या भूपाळ्या जगप्रसिद्ध आहेत. सर्व दृष्टीनें पाहतां, त्या वाणींत उत्तम पण सोप्या, सरळ व प्रसंगोपात भव्य अशा आहेत. त्या श्रोतृजनांचे श्रम नाहींसे करणाऱ्या आणि ज्ञान्याला आनंद देणाऱ्या आहेत. दैवीशक्तिचा तो प्रसाद आहे. होऊन जाणारें गायन आणि मधुर स्वर, प्रभातसमयीं पुष्पोद्यानांतून धीर समीराच्या मृदु मृदु तरंगांबरोबर येणाऱ्या अभिनव सुमनांच्या सुगंधासारखी त्या भूपाळ्यांची मनोहारता आहे. अनुभवी मनुष्याला खालीं दिलेलें प्रभातवर्णन तंतोतंत पटल्याशिवाय राहणार नाहीं.

" प्रभात जाणी पंखीडां रे उड्यां, काका करे त्या काका रे; "
" पपैयातो पियु पियु झंखे, कुडा कौकौ करे वड शाखारे " टेक
" मोर टौकार कळा करे सुंदर, आंसु वहे ढेर वीणेरे; "
" पलाश पर रुडा पोपट बोले, कोइलडी टऊके स्वर झीणे रे. "
" चकचक करती चकलियुं, आवे जाणे वियोग तो भागेरे; "
" खुश खुश खुश खीशकोली के, छे, राधानें रडुं न लागेरे !"
" वाछरुं भां भां शब्दज भणतां, गाईंथुं दां दां शब्द बोलेरे. "
" शीतळ मंद पवन सुवासित, वामा वच्च उडाडीने डोलेरे. "

प्रभात०—

## त्यांच्या कवितेबद्दल सामान्य विचार.

अखिल गुजराथ देशांत त्या भूपाळ्या श्रेष्ठ, सुंदर, भव्य आणि मोहक गणल्या गेल्या आहेत. भोळ्या आणि

भक्तिपरायण अंतःकरणाचे ते उमाळे आहेत, आत्मज्ञानाचे ते उद्गार आहेत. त्या हृदय-रसाच्या वाहणाऱ्या नदीच्या ओघासमान आहेत. मेहेताजींच्याच भाषेंत म्हटलें तर, " एहनी एहने एज शोभा. " शांत रसानें ओतप्रोत भरलेल्या त्या भूपाळ्या सुधेसारख्या परम शांतिप्रद आहेत. रंग रसानें त्या हृदयरमणीय आहेत. संस्कार झालेला मणि जसा सुंदर दिसतो, तशी मेहेताजींची भक्ति त्यांच्या ज्ञानामुळें अधिक शोभायमान झाली आहे. मेहेताजींच्या कवितेंत ज्ञान, उपदेश आणि शृंगार, झळकत आहे. आतां आपण मेहेताजींची भाषा आणि शैली या विषयीं थोडा विचार करूं.

मेहेताजी संस्कारी कवि होते. म्हणून त्यांची भाषाहि संस्कारानें युक्त असेल ही गोष्ट संभवनीय आहे. त्यांत आणखी ते नागर होते म्हणून त्यांच्या भाषेंत नागरत्व तर असलेंच पाहिजे. आज त्यांना सुमारें चारशेंच्या वर वर्षें होऊन गेलीं आहेत; त्यावेळची मूळ भाषा कशी होती याविषयीं आपणाला कांहीं सांगतां येत नाहीं. कारण पाठभेदानें कालान्तरानें भाषेंतहि भेद उत्पन्न होतो. मेहेताजींची भाषा किती विकृती पावली आहे, त्यासंबंधानें आपणाला कांहीं सांगतां येणार नाहीं. परंतु त्यांची कविता वाचतांना आपणाला असें सहज कळून येईल कीं, मेहेताजी चांगल्या रीतीनें संस्कार पावलेले पुरुष होते.

त्यांचें संस्कृत भाषेचें ज्ञान चांगलेंच असावें. खरें म्हटलें तर, कविता हें मनुष्याच्या विद्वत्तेचें मापक यंत्र आहे. मेहेताजींच्या कवितेंत संस्कृत शब्द पुष्कळच आहेत, आणि ते जरी विकृत झालेले आहेत, तरी पण कवीला असलेली मुभा आणि कालांतरानें होणारे फरक, ह्या दोन गोष्टींकडे लक्ष देऊन आपण विचार केला, तर आपणांस सहज कळून येईल कीं, मेहेताजींची भाषा फारच उच्च प्रतीची आहे. मेहेताजींची भाषा कोमल आहे. थेट स्त्रियाची कोमलता—रसिक, प्रेमवेड्या प्रमदेची कोमलता— हेंच त्यांच्या कवितेचें सौंदर्य आहे. हावभाव—दर्शक, अनुकरणवाचक शब्दांनीं त्यांची कविता अलंकृत झाली आहे. विलास त्यांत व्यापून राहिला आहे. " मरकलडो करी बहाला सन्मुख, शणगटडो " प्रमाणें दिव्य कविते-सारखी त्यांची कविता आहे. त्यांच्या कवितेंत झांझेची झुमझुम, पायाची रुणझुण, तरुणींच्या टाळ्यांचा ताल, ' अडपडीआळी आंखडली ' ची मर्मभेदकता, पायांनीं डगमगत आणि ' कुमकुमने पगले पधारो राज, कुमकुमने पगले ' या शब्दांत वर्णिलेली सौभाग्यसूचक मंगलता आहे. कित्येक प्रसंगीं आपणाला मेहेताजींच्या भाषेंत उघड शृंगार दिसतो; पण तो त्यांच्या भावनांच्या उत्कट-तेचा परिणाम आहे. त्यांच्या भाषेंत वेळोवेळीं मराठी व हिंदुस्थानी शब्द, तसेंच षष्ठी विभक्तिच्या अर्थानें योजि-लेले प्रत्यय, इत्यादि येतात खरें, परंतु त्यावरून मेहेताजींना

त्या भाषेचें ज्ञान होतें असें अनुमान होऊं शकत नाहीं. मेहेताजी सौराष्ट्री होते, आणि त्यांत नागर होते, म्हणून त्यांची भाषा शुद्ध सौराष्ट्री गुजराथी असेल ही गोष्ट विशेष संभवनीय आहे. कदाचित् असेंहि असेल कीं, मेहेताजींच्या नंतरच्या भक्तांनीं आपल्या अपभ्रष्ट भाषेच्या द्वारां त्य भक्तराजाच्या लोकप्रिय भूपाळ्या इत्यादि कवितेंत मराठी तसेंच हिंदुस्थानी भाषेचे शब्द व प्रत्यय घुसडून दिले असतील. मेहेताजींच्या वेळीं सौराष्ट्रीयांचा महाराष्ट्री लोकांबरोबर संबंध नव्हता, आणि त्यावेळीं महाराष्ट्राचा एकादा प्रख्यात कवि अगर लेखक आपल्या देशांत होऊन गेला असेल असेंहि आपल्या ऐकण्यांत नाहीं. म्हणून मेहेताजी अशुद्ध—भेसळ शब्द असलेल्या भाषेच्या उपयोग करण्याच्या दोषांतून मुक्त झाले आहेत. त्यांच्या नंतर गुजराथी भाषा आपल्या उच्च स्थानापासून च्युत झाली, आणि मराठी राज्याच्या सत्तेखालीं राहून भ्रष्ट झाली. जोपर्यंत मराठी राज्याचा गुजराथेंत जोर होता, तोपर्यंत गुजराथेंतील लोक मराठी भाषेचे थोड्या फार अंशानें उपासक झाले, आणि त्या स्थितींत त्यांच्या बोलण्या-लिहिण्यांत मराठीची छटा आली. अशा समयीं लिहिलेल्य मेहेताजींच्या कवितेच्या प्रतींत जर मराठी किंवा हिंदु-स्थानी शब्द आले असले तर ती मेहेताजींची भाषा नाहीं. परंतु, गुजराथ्यांची त्या वेळेची अपभ्रष्ट भाषा आहे. इतकें म्हणतां येईल कीं, मेहेताजींची भाषा सांप्रतकालच्या

शुद्ध गुजराथी मानल्या जागाऱ्या भाषेसारखी नसेल, परंतु ती त्यावेळीं गणलेली शुद्ध गुजराथी तर असलीच पाहिजे. असें मत धरून मेहेताजींच्या भाषेला शुद्ध आणि सरळ म्हणतां येईल. खरी गुजराथी भाषा कोणती—या काळची कीं मेहेताजींच्या काळची—या प्रश्नाचें निराकरण जोंपर्यंत झालें नाहीं, तोंपर्यंत कोणीहि त्या भाषेबद्दल निश्चित असें कांहींच म्हणूं शकणार नाहीं; परंतु मेहेताजींची भाषा अशुद्ध असेल असें म्हणून त्यांस दोष देण्याचें धाडस करूं नये हेंच बरें.

## गुर्जर साहित्यावर त्यांची छाप.

आतां आपण मेहेताजींच्या भाषेचा व कवितेचा त्यांच्यानंतर झालेल्या कवि व लेखकांवर कसा काय परिणाम झाला ह्या विषयाचें त्रोटक विवेचन करूं. मेहेताजींना आद्य कवि म्हटलें आहे, त्याचें मूळ कारण तर हेंच कीं, त्यांच्यानंतर झालेल्या कवींनीं त्यांच्याविषयीं लिहवेल तितकें लिहिलें आहे, आणि त्यांचा महिमा गाइला आहे. अर्थात त्या सर्व कवींनीं नरसिंह मेहेताच्या काव्याचा चांगल्या रीतीनें अभ्यास केला असला पाहिजे. जर त्यांनीं अभ्यास केला नसता तर त्यांना मेहेताजींच्या चरित्रासंबंधीं माहिती कशी झाली असती ? मेहेताजींच्या कवितेवरून त्या लेखकांनीं अवश्य तितकें ज्ञान मिळवून त्यावरून त्यांनीं आपलीं काव्यें लिहिलीं. हें मेहताजींच्या

कवितेच्या अभ्यासाचेंच फळ होय, हें विशेष संभवनीय आहे. मेहेताजींच्या गृहसंसारावर प्रेमानंदादि कवींनीं आणि त्यांच्या कृष्णभक्तीच्या ललित पदावरून वैष्णव मार्गी कवींनीं स्वतः काव्यें रचिलीं आहेत. कृष्णभक्तीला प्रसिद्धि देणारे पहिले गुर्जरकवि नरसिंह मेहेताच होत. नरसिंहाच्या वीणेनें, दयारामासारख्या कृष्णभक्तीच्या विषयावर लिहिणाऱ्यांच्या हृदयाला वाचविलें, ही गोष्टही खरीच. आणखी आधुनिक कालांत लिहिलेल्या नाटकांत आणि गायन कवितेंतहि नरसिंहाची रसमूर्ति शृंगार, लालित्य, वगैरेंनीं युक्त अशी आपल्या पाहण्यांत येते. गुर्जर साहित्यांत शृंगाररसाचें बीज लावणारे आणि त्याला ' सुसंगत भाषाद्वारा प्रकाशविणारे कवि मेहेताजीच. मेहेताजींची शृंगारिक पदें वाचल्यानंतर जर आपण दुसऱ्या एकाद्या कवीचीं पदें वाचलीं, तर तीं फार फिक्कीं पडतात. या विषयांत—म्हणजे शृंगाररसाच्या कवितेच्या क्षेत्रांत-मेहताजींच्या कल्पना सर्वकाळीं रमणीयच वाटतील. अर्थात् जोंपर्यंत गुजराथ देश राहील, तोंपर्यंत मेहेताजींचें शृंगारवर्णनयुक्त पदलालित्याचें अनुकरण लेखकांकडून होतच जाईल; मेहताजींच्या शाळेंत संप्रदायिकाची संख्या वाढतच जाईल. मेहेताजींच्या पूर्वी होऊन गेलेल्या कोणत्याहि कवीचा असा बलवान परिणाम झालाच नाहीं, आणि त्यांचा झाला आहे म्हणूनच त्यांचें कविकुलांत आद्यत्व सिद्ध आहे.

## काव्यकलेविषयीं त्यांचें ज्ञान.

याप्रमाणें मेहेताजींच्या कवित्वशक्तीविषयीं आपण लिहवेल तितकें लिहिलें आहे. परंतु त्यांच्या अलंकारशास्त्र व संगीतशास्त्राच्या ज्ञानासंबंधानें आपण कांहींही लिहिलें नाहीं. आपणास आतां असें पाहवयाचें आहे कीं, मेहेताजींनीं, कवीचें शस्त्र जें सृष्टीच्या पदार्थांचें अवलोकन आणि त्याचें आपल्या भावनांशीं एकीकरण, त्याचा उपयोग उत्तम रीतीनें केला आहे, व अलंकाराचाही त्यांनीं पुष्कळ उपयोग केला आहे, व म्हणून त्यांची कविता अंतःकरणाला चटका लावित व आपणाला काव्यरसांत गर्क करून टाकिते. गोविंदगमन नांवाच्या काव्यांत ' एहगुण उपमा एह तोले ' यांत अन्वयालंकार; " सलिलविण सूकशे बेल प्यारी " यांत रूप अलंकार ' वदने काजळ कशुं, हार विण हार जशुं, तांबुल लागियां कंथमारा ' यांत असंगत्याग अलंकार ' केवढा उपर काली जशो सर्प ए, भक्ति बळी सर्प एम शब्द सुणियो' यांत सर्प म्हणजे नाग आणि सर्प म्हणजे ' चल सखी ' असा शब्दांचा अर्थ करून श्लेषालंकार; दानलीलेच्या काव्यांच्या आठराव्या पदांत फाल्गुन मास दर्शनामुळें होणाऱ्या आनंदाचा परिणाम ' पडी प्रेमने पाश हां हां " लिहून परिणामालंकार:—

" चंद्र विंट्यो जेम चांदरणीए तरुवर विंट्यो वेली रे "
" गोविंद पिंट्यो गोवाळणीए, हंसागवनी हेली रे "

हीं जीं दोन चरणें ' खंम खंम रे चांदला मा करीश वह्याणलुं ' ह्या चरणानें सुरू होणाऱ्या विरहव्यथादर्शक पदांत मेहेताजी दृष्टांतोपमालंकार देत आहेत. आणखी सुरत संग्राम काव्यांत ' पलाशनुं फूल शुं, रातुं दुफुल शुं, जाणे अधिक एथी मदे राती वाळी ' या पदांत व्यतिरेकालंकार:—

" हार विण ऊर नहि, ऊर विण हार नहि;
तेम अन्योन्य रात दीपे "
" शूर विण सैन्य नहि, सैन्य विण शूर नहि;
छीप चळकाट अन्योन्य दीपे "

या चरणांत उपमेयोपमालंकार, आणि शेवटीं ' कमल नेत्र, मुखचंद्र, आणि नरपशू ' इत्यादि सारख्या अनेक अलंकारांनीं मेहेताजींची कविता रसपूर्ण बनली आहे. मेहेताजींच्या सजीवारोपणाचे दृष्टांत खालील पदांत आढळतील—

" वृक्षवेली सर्व ऋषीराणी, भक्ति ते राधिका, मुक्ति जशोमति, व्रज वैकुंठ ते वेदवाणी, निगम वसुदेवजी, गाय गोपी रुचा, देवकी ब्रम्हपिवाद कहावे; ब्रम्हा कर लाकडी वेणु महादेवजी, पंचवदन करी गान गावे. "

यावरून मेहेताजींना भाषाशास्त्राचे तसेच अलंकारशास्त्राचे ज्ञातेच म्हणण्यास हरकत नाहीं. मेहेताजींच्या कवितेला सुवर्णलंकारानें सुशोभित ललनाच

म्हटली पाहिजे. त्यांचें कवित्व उच्च प्रतीचें म्हटल्याशिवाय चालणार नाहीं. शब्दालंकाराबरोबर अर्थालंकार वापरणाऱ्या मेहेताजींचें कवित्व साधें, मनोहर आणि सरळ आहे, असें आपणास कबूल करणें भाग पडेल; मेहेताजींच्या कवितेंत ठिकठिकाणीं 'झटक मटक' दिसून येत आहे. झटकच्या उदाहरणांत 'सुरत संग्राम' च्या चौथ्या पदाचें दुसरें चरण आहे:– 'कीडियां कटक ते, शुं करे मटकथी, झटक पटक दही पकडी घाई.' याशिवाय 'स्वमनने बोधती, तर्क पुरि रोधती, समयने शोधती, सर्व श्यामा.'

✽ ✽ ✽

" मोहिनी, सोहनी, गर्विणी दोहिनी, × × ×
" मदेवा कारणे, गर्वमां धारणे, दर्दमां तारुणी मद हरतां "
" चर्ण धरी धर्णमां, वर्ण के कर्णमां, शर्ण छे कोई हर्ण वेळा "

✽ ✽ ✽

" रुमने रोळीने, शुमने चोळीने, दुमने कुंभ लई कुंभ फूटे "
" अंग उमंग लई, रंग बेरंग थई, उचरे व्यंग उछरंग आगे "
"नाद करी पादने, वाद धरी मादने, साद उल्लाद विखवाद मागे."

झंप्याच्या उदाहरणा दाखल खालील चरण आपण घेऊं या:

" एवे नंदनो नंद, आनंदनो कंद जे, जाय ते वाटजो नंदजी आवे
" देह छे जुठडी, करम छे जुठडां, × × ×
" दुष्टनी संगते दुष्टमति उपजे, × × ×
" ब्रम्ह लटकां, करे ब्रम्ह पासे, × × ×

लाटेचे प्रास किंवा वर्णांचे नातें खालील चरणात प्रत्यक्ष दिसत आहेः—

" जीवता जन ते तो जन जेवा जाणवा, ❀ ❀ ❀
❀ ❀ ❀ नारीने नमवुं ए नीच केवुं ? "
❀ ❀ ❀ वेण बिचारी वाई गोपराजे, "

याप्रमाणें आपण मेहेताजींच्या अलंकार शास्त्राच्या ज्ञानाचे सामान्यरीत्या निरीक्षण केलें आहे. त्यांच्या कवितेंत अलंकारांचीं अनेक उदाहरणें आहेत. मेहेताजींचे कित्येक अलंकार तर अगदीं विचित्र आणि स्वयं-शोधित आहेत. 'राधेचा हात्ती' आणि 'कटार जे वांकडी उछळती लांकडी' व असेच अनेक अलंकार मेहेताजींच्या उत्पादक शक्तीचीं सुंदर उदाहरणें आहेत. मेहेताजींच्या कविलेला अलंकाररहित कोण म्हणेल ?

मेहेताजींच्या कवितेंत असंबद्ध छंदाचे तर नांवसुद्धा सांपडणार नाहीं. ते प्रास जुळवून लिहिणारे असून संगीत शास्त्रांत प्रविण होते. त्यांच्या काव्यांत संगीत विषयक शब्द इतस्ततः दिसून येत आहेत. सामेरी, मारु, धन्यश्री कानडा, असावरी, रामश्री गोडी, देशाख, सारंग, बिहा- गडो, कालेरो, नट, मल्हार, मेवाड, बिलावर, वसंत दोढी, केदार, कल्याण, माधव, पचमकोफी, सोरठ वगैरे रागांत मेहेताजींनीं पद्यें लिहिलीं आहेत. मेहेताजींच्या काव्यांत रूप झुम रुम झुम नुपुर आणि झांझांचा आवाज दुमदुमून राहिला आहे.

## राग रागिणी व तान.

अहां तवता थईरे, इहां तनतन हीरे.

❀ ❀ ❀

गुणणण गणगण उपेग वाजे, तांकीनी शंख मृदंग,
इहां रुम झुम रुम झुमेर, इहां झांझर झमकेरे,
इहां हम हम ठमकेरे, इहां विछीडा चमकेरे

वरील पद्यावरून सहज कळून येतें कीं, मेहेताजींना संगीत शास्त्राचें ज्ञान चांगलें होतें. 'धुन' आदिकरून जे शब्द त्यांनीं वापरले आहेत, ते शब्दहि उक्त अभिप्रायाला पुष्टी देणारे आहेत. मेहेताजींच्या सर्व कविता वाचतांना सहजच समजून येतें कीं, त्यांचें संगीत शास्त्राचें ज्ञान खोल आणि एकवटलेलें होतें, मेहेताजींच्या कवितेचा आत्मा संगीत हा आहे. वाद्याचेहि ते चहाते असावे, असें सहजगत्या आपणास समजून येतें. गानवाद्यांचा आवाज आणि त्याच्याबरोबर भाषेची मृदुता, हीं त्यांच्या काव्यांत चांगल्या रीतीनें प्रतीत होत आहेत. मेहेताजींनीं आपल्या नायक श्रीकृष्णाचें चित्र फार उत्तम रितीनें रंगविलें आहे. कामानें वेड्या झालेल्या गोपी आणि नाईका राधिकाची त्यांची भक्ति वेडाला अनुकूळ आहे. मेहेताजींचा प्रधान काव्य-रस शृंगार आहे. श्रंगारासंबंधीं असणारे हावभाव आणि अनुभव इत्यादिविषयीं त्यांनां चांगलें ज्ञान असावें असें दिसून येतें. "अष्टादश हावमां,

वळि पंच भावमां, पकडतां दावमां दाह पाय " या चरणाच्या उल्लेखावरून मेहेताजींचें रसज्ञान प्रतिपादित होत आहे. शृंगाररसाला उद्दीपित करणारा सुगंध, शीतल आणि मंद असा त्रिविध वायु असावा, असें त्यांनीं वर्णन केलें आहे. "वळि त्रिवध पवन त्यां वाय, एम नाचेने गोविंद गाय." "नवधामां तो नहीं नरवेडो, दशधामां देखाशेरे" या वाक्यावरून मेहेताजी कित्येक प्रकारच्या रसांचे ज्ञानी होते असें दिसून येतें. प्रत्येक रसाच्या भावना किती उच्च आणि प्रबल होतात तें त्यांनीं दाखविलें आहे. पुष्कळ कवि एकच रसाला फारच चांगल्या रितीनें उठावदार करूं शकतात. त्याप्रमाणें मेहेताजीही शृंगार-रस आणि तदनुरूप चेष्टचें आपल्याला हुबेहुब दर्शन करवून देतात. मेहेताजींचा शृंगार वेड लावणारा आहे. रसमत्त नायिका आणि प्रेमपीयूष पिणारे कृष्णजी जणूं काय रसाचे झरेच आहेत ! हें शृंगारवर्णन उत्तान परंतु मार्मिक आहे. सुरत संग्रामांत ते अतिरेकी होऊन जातात खरे, परंतु तो प्रेममदिरापानाचा परिणाम आहे. वरील अभिप्रायाला अनुरूप असे दृष्टांत देण्यांत आपल्या या लेखांतहि अश्लीलता येईल म्हणून ते दिले नाहींत; परंतु, वाचक ते जाणण्याला जर उत्सुक असतील तर त्यांनीं प्रेमभक्तीच्या काव्याची ११८, ११ वगैरे शृंगाराचीं पद्यें पहावीं. सहृदयेच्या गुणानें हे नायकाच्या प्रत्येक भेदाचें उत्तम वर्णन देऊं शकले आहेत

मेहेताजींच्या कवितेचें सूक्ष्म निरीक्षण केलें, तर असें आढळून येईल कीं, त्यांच्या कवितेंत उपयोगांत आणलेल्या कित्येक उपमा आणि दृष्टांत, त्यांचें अलौकिक ज्ञान, विशाल अनुभव व सूक्ष्म अवलोकनशक्ति वगैरेंची फारच चांगली साक्ष देत आहेत. संसार व्यवहाराचें त्यांना किती ज्ञान होतें तेंहि त्यावरून कळूं शकतें. रासक्रीडेचें वर्णन देतांना मेहेताजींनीं त्या सूक्ष्म लीलाविषयीं इतकें उत्तम वर्णन केलें आहे कीं, जणूं काय स्वत: त्यांनींच तें अनुभविलें व लिहिलें असावें असें भासतें! सुंदरीच्या मुक्ताफलानें युक्त एकेरी हार, कनककुंडलाचे मनोहर आंदोलन व कंकणाचे मृदु झुणझुण नाद, इत्यादि प्रेमावेशांत होणाऱ्या चेष्टांचें मेहेताजींनीं सूक्ष्म दृष्टीनें अवलोकन केलें असावें, असें स्पष्ट दिसून येतें. या भक्तराजाचें सर्वानुभवी कवित्व प्रतिपादन करण्यांत, अशा कविता एक उत्तम साधन आहेत. त्यांनीं दिलेले अनेक दृष्टांत अवलोकन केले तरीहि आपल्याला प्रतीति होईल कीं, कविराजाचें अनुभव-ज्ञान अतिशय अगाध आणि सूक्ष्म होतें. त्यांच्या कित्येक उपमा तर आपणाला महाकवि कालिदासाचें स्मरण करवीत आहेत. मेहेताजी संस्कृत शिकलेले होते आणि त्यांनीं शाकुंतल नाटकहि वाचलें असावें असें अनुमान होऊं शकेल!

" मुख्य स्वामिनी आगे दोडे तिनी स्वराने शुं कहिये. "
" दोडतां रेती जे उडती ते घोड्या आगळ पाळी पडती; "
" काठीनी घोडी जोडी करूं किम, वेगे ताजण कंइ आथडती. "

शाकुंतल नाटकांत दुष्यंताच्या घोड्याच्या वेगाचे वर्णन देणारा कालिदास "धोडतां रेती जे उडती ते, घोड्या आगाळ पाछी पडती" असेच विचार दर्शवीत आहे. मेहेताजींच्या वेळीं काठी लोकांचे घोडे त्यांच्या वेगाबद्दल प्रख्यात असतील, असेंहि अनुमान होऊं शकते! कारण कीं, नरसिंहरामानीं ते घोडे श्रेष्ठ समजून, वेगांत–अर्थांत प्रेमाच्या–राधेला त्यांच्याहूनही श्रेष्ठ मानिलें आहे. आणखी

"रथ वेगे वाजे घणो रे, ते गोपी टकटक जोय;
अरे ससि हरितो गया रे, शीवले आपणी होय.
जेवा तेवा हरि दिसशेरे, चालो चढिये उंची ढाळ;
जेम जेम हरि जाय छे रे, तेम तेम उंची चढती बाळ-
पछे हरि दिसता रदपा रे, एक रथ देखे सहुको नार;
ओरथ दिसतो रह्यो रे, टक टक धज जोइ रही निधार.
धज पण छूपी गयो रे, तहीं रज जोती ते काच;
ते जब नव ऊडी रे, ताइ चढी कीर्तिनी बाळ"

या पद्यांतील दृष्टांत किती मार्मिक आहेत तें सहज समजून येईल.

मेहेताजी सर्वसाधारण लोकांकरितांच जन्मलेले कवि आहेत. प्रेमानंद भट पुराणीक व पंडिताकरितां आहेत. आणि भोजलराम बाबा जोगी लोकाकरितां कवी आहेत.

मेहेताजी जें लिहितात तें सरळ आणि साध्या भाषेंत लिहितात व तें अशा रीतीनें कीं, साधारण जनसमाज तें समजूं शकेल. संसारांत असलेल्या प्राण्याच्या उद्धाराला त्यांची कविता समर्थ आहे, सांसारिकाला प्रिय वाटेल अशी असूनहि तिच्यांतील ब्रह्मज्ञान इतकें उच्च आहे कीं, त्या दोहोंचा मधुर संगम झालेला दिसून येतो. त्यांच्या धवल स्वच्छ ब्रह्मज्ञानाच्या पदांवर शृंगाराच्या कुंकुमाची छटा पसरलीं आहे, म्हणून ती राग दृष्टीच्या भावानें अधिक सुंदर झाली आहेत. संसारी मनुष्याला ब्रह्मज्ञानाचा बोध करण्यासाठीं मेहेताजींसारख्या कवीची जरूर आहे. मेहेताजी सर्वांना प्रिय असें कवी झाले आहेत. त्याचें कारण त्यांची कविता 'केशरानें भिजलेली' ब्रह्म ज्ञानाची कविताच आहे. त्या कविता सहज पाठ होण्यासारख्या आहेत. त्यांची भाषा शुद्ध आणि सरस आहे म्हणूनच उच्च वर्गांत विशेष पूज्य आहे. भोजलची भाषा भारदस्त आणि प्रेमानंदाची पांडित्यानें युक्त असून ते उभय कवी श्रेष्ठ आहेत, तथापि ते जनसमाजाच्या दृष्टीनें एका ठराविक वर्गांतच आदरणीय झाले आहेत.

---

## मेहेताजीचे धार्मिक विचार

नरसिंह मेहेताचें धर्मविचार या संबंधानें आतां आपण करूं. मेहेताजींची धर्मावर फारच श्रद्धा होती

धर्म हेंच त्यांचें अंतर्जीवन होतें. धर्माशिवायच्या मनुष्याला ' नरपशु ' समान ते गणत होते. मेहेताजींच्या वेळीं सामान्य जनसमाज शैव मताचें पालन करणारा होता, म्हणून तेहि आपल्या यौवनावस्थेंत शैव मताचे असावे असें अनुमान होतें. त्यांना त्यांच्या भावजईचें वाग्बाण दु:सह झाल्यामुळें ते शिवाची आराधना करावयास गेले होते, ही गोष्टही याच अभिप्रायाला पुष्टि देत आहे. पण असेंही म्हणतां येईल कीं, तो काळ मेहेताजीच्या विचारमंथनाचा काल होता, म्हणून त्यांचें अंत:करण धर्मविषयांत स्थिर झालें नव्हतें. त्यांच्या तरंगित चित्ताकाशांत त्यावेळीं कृष्णभक्तिचीं किरणें स्फुरण पावण्यास लागलीं असलीं पाहिजेत. कृष्णपरमात्म्याच्या लीला पाहण्यांत त्यांचे जें मन लागलें होतें तें, त्यांच्या या विचाराचें फल असलें पाहिजे. वाटेल त्या कारणानें होईना पण त्यांच्यांत कृष्ण भक्तीचें बीज लागलें गेलें, व तिला पल्लवित करण्याचा समय शेवटीं येऊन पोंहोंचला. शिवभक्तिद्वारानें त्यांनीं कृष्णभक्ति संपादन केली. मेहेताजी त्यांच्या तारुण्यावस्थेंत शिवमार्गी आणि नंतर वैष्णवपंथी झाले त्यांना शिवाचें भस्म न आवडतां कृष्णाचें केशर आवडूं लागलें. नरसिंह मेहेताचें असें मत आहे कीं,—

" संसार बेवार साचविये, विकारथी वेगळा रहिये रे."

या सिद्धांतानुरुप आपलें आचरण ठेऊन त्यांनीं प्रथम गृहस्थाश्रमाचें नियम पाळण्याचें कबूल केलें असावें, असें अनुमान निघतें, त्यांनीं आपल्या चरित्राच्या प्रातःकालांत शिवभक्ति, आणि माध्यान्ह कालांत कृष्णभक्ति आचरली. ती अशी कीं, " साचे मने अने सत्य वादे." आणि " प्रेम होय तो प्रगट जणाये, ते तो न रहे छानुं रे " आणि सायंकाळीं वेदांती होऊन ब्रह्मज्ञानांत आपल्या सर्व वृत्तींना लीन केलें. त्यांनीं आचरलेला हा मार्ग योग्य व स्तुत्यच आहे. त्यांनीं क्रमाक्रमानें आपला उद्देश पार पाडला आणि—

" वेद वेदांत उपनिषदो खट मळी, जे मथीने रस प्रगट कीधो "

" ते रस भाग्यनिधी भामनी भोगवे, अहोनिश अनुभव संग लीधो."

त्या संबंधीं हल्लीं कांहींही सांपडत नाहीं. जें कांहीं त्यांनीं लिहिलें आहे ते कृष्णभक्ति करीत असतांनाच लिहिलें.

हें पद मेहेताजींच्या जीवनसंध्येच्या शोभेचा प्रसाद आहे. ज्याप्रमाणें सूर्य आपल्या तेजाच्या प्रभावानें आकाशांत इतस्ततः संचार करणाऱ्या मेघमंडळांना रंगीबेरंगी

पातळ वस्त्रें नेसवून प्रेक्षकांना आनंद देणारें सृष्टिलीलेचें सौंदर्य आणि त्याची भव्यता यांचें दर्शन करवून देतो त्याचप्रमाणें आपले भक्तराज आपल्या जीवनमूर्तीच्या मुळाशीं पोंचून रसकान्तियुक्त स्वबलानें कविताक्षेत्राला आपल्या सुशोभित रंगानें रंगवून देऊन, वाचक वर्गाला आपल्या अंत:सृष्टिचें सत्य सुंदर स्वरूप प्रत्यक्ष दाखवीत आहेत. वरील दोन चरणांचें विवरण केलें तर हाच अर्थ निघेल कीं, मेहेताजींनी वेद, वेदान्त, खट, षड्दर्शन या सर्वांचे मंथन करून जो ब्रह्मज्ञानाचा रस प्रगट केला आहे तो रस भाग्यवान भामिनी गोपी–मेहेताजी भोगीत आहेत आणि त्याला त्यांनीं आतां आपला नेहमींचा मित्र बनविला आहे. मेहेताजींच्या चरित्ररूपीं सोपानपरंपरेचें प्रथम पद शिवभक्ति आणि शेवटचें पद ब्रह्मज्ञान होय. त्या उभय टोंकाचा मधला भाग कृष्णभक्तीनें व्याप्त झालेला आहे. जोंपर्यंत ते संसारांत राहिले तोंपर्यंत त्यांनीं व्यवहारकुशलतेनें विवेकाचें सेवन करून आपल्या हृद-यस्थ भक्तिभावाचें पोषण केलें, आणि जसें ते संसाराच्या कार्यांतून पार पडले, तसा त्यांनीं, पूर्ण वैराग्यांत प्रवेश केला. ‘ ममता भांगी ते वेरागी, अनहदशृंगी बोले रे.।’ वर दर्शविल्याप्रमाणें मेहेताजींचा उत्तरोत्तर धर्मविका-साचा क्रम होता. ते जेव्हां शिवभक्त होते तेव्हां त्यांनीं शिवभक्तीसंबंधाच्या विषयावर कांहीं लिहिलें असेल पण

त्यासंबंधीं हल्लीं कांहींही सापडत नाहीं. जें काहीं त्यांनीं लिहिलें आहे तें कृष्णभक्ति करीत असतानांच. शिवानें केलेल्या उपकाराचा कोठें कोठें त्यांनीं आभारदर्शक उल्लेख केला आहे. “ उमीया इशकुपार्थी उभो, नारसैयो रंग जुये, ” मेहेताजीनीं कृष्णाची भक्ति करण्यांत आपली सर्व प्रकारें कुशलता प्रदर्शित केली आहे. “ जेने जेशुं प्रीतज होय, ते ते सामु जोये रे. ” मेहेताजींची परमात्मा यादवेन्दुवर “ सुंदरीओनो स्वभाव छे एवो, पीयुने मळवा हिंडे घणुं ” अशा रीतीची प्रीती होती आणि म्हणून त्यांनीं, आपल्याला गोपी समजून कृष्णाच्या बरोबर मैत्री संपादली होती. निष्काम भक्तीनें मेहेताजींच्या अंतःकरणाला वश करून घेतलें होतें. प्रेमरूपी गारोडी ज्याप्रमाणें त्यांना नाचवीत होता, त्याप्रमाणें ते नाचत होते. ते जे “ सान करी समझावतो ” होता तें तें समजून जात होते. स्नेहरुपी शृंखलेनें ते जखडून गेले होते. मोहक बांसरीच्या मधुर नादानें त्यांचें अंतःकरण वेधून गेलें होतें. प्रेमतृष्णा त्यांना तरफडवीत होती. दिव्य संगीताच्या नादाचें श्रवण करीत असतां त्यांचा प्रेमवेडा आत्मा अधिकाधिक उसळत होता. कृष्णाला प्रेम प्रिय आहे. मेहेताजींनाहि प्रेम प्रिय होतें. प्रेम–जलाचा एक बिंदु ज्यानें चाखला आहे, त्याचें अखिल जीवित प्रेममयच असतें. मेहेताजींनीं तर प्रेमाचें आकंठ पान केलें आहे. ज्यांनीं ज्यांनीं प्रेमाचें पान

केलें आहे, ते सर्व मेहेताजीसमान आहेत. प्रमाच्या सरोवरांत स्नान करणारे सर्वच समान आहेत. परमेश्वराच्या दृष्टीनें ते सर्व आत्मे एकाच दर्जाचे आहेत. “ उभय मनडां प्रेमे बांध्यां कहो पछी भेद शो ! ” प्रेमाला भेदभाव ठाऊक नसतो. असें त्यांचें ज्ञान होतें. म्हणून ते एका महार भक्ताचे घरीं सुद्धां गावयास गेले होते. नागर जातीनें त्यांना जातीबाहेर टाकलें होतें. जेव्हां पंक्तिभोजन झालें होतें तेव्हां त्यांनीं नरसिंहरायाला आमंत्रण दिलें नव्हतें, म्हणून त्या नागरांचे पंक्तीत नागरांना एक नागर व एक चांभार असे दिसले व शेवटीं नागर लोकांनीं त्यांना जातींत घेतलें आणि आपल्या अपराधाबद्दल मेहेताजीजवळ क्षमेची योजना केली. मेहेताजी जातीबाहेर होते, तथापि त्यांत ते आनंद मानून रहात असत.

“ भक्ति करतां जो भ्रष्ट कहेशो, तो करशुं दामोदर सेवारे ”
‘ सघकामां हुं भुंडो, कहेवुं होय ते कहेजोरे, मने नेह लाग्यो उंडोरे.’

अशा सरळ शब्दांत ते जातिशिक्षेबद्दल आपली निर्भयता दाखवीत आहेत. हृदयोर्मीला संतुष्ट करीत असतां जर जातिभ्रष्ट झालें तर काय हरकत आहे ? सार्वजनिक प्रेमाचे ते सेवन करीत होते. कृष्णभक्तींत ते वहिवाटले होते म्हणून दुसऱ्या पदार्थांत त्यांचे चित्त नव्हतें. भक्ति करावी तर कृष्णाचीच.

ते म्हणत असत कीं:—

" कृष्ण किर्तन विना, नर सदा सुतकी,
विमळ कीधे वपु शुद्ध न थाये;
सकळ तीरथ श्रीकृष्ण किर्तन कथा,
हरितणा दास ज्यां देते गाये.
पुर्ण पुरुषोत्तम, नवल रंगी तजी,
अन्य देवे जेनुं मन मोहे;
कोटि चिंताणणी, कामधेनु तजी,
महिषिना पुत्रनुं दूध दोहे."

संसाराब्धींतून तारणारी नौका कृष्णभक्तीच आहे. " जीवता जन ते तो जग जेवा जाणवा, प्रीत नहि जेहने कृष्ण साथे." कृष्णभक्ति हेंच जीवन आहे. त्याशिवाय दुसरें सर्व व्यर्थ आहे. मेहेताजी याप्रमाणें कृष्णभक्तींत लीन होऊन या अखिल भक्तसृष्टीला गोपिरुपानें वर्णन करीत आहेत. मेहेताजी स्वतःही गोपीच आहेत. स्वत: त्यांनीं आपल्याला 'मशाली' असें वर्णिले आहेत, त्याचा अर्थहि इतकाच आहे कीं, मेहेताजीनीं हातांत मशाल धरली आहे त्या योगानें ते ईश्वरलीलेचे दर्शन करीत आहेत; म्हणजे ज्ञान दीपकाच्या सहाय्यानें ते अविद्येच्या अंधकाराचा नाश करून ईश्वराचा महिमा समजून घेत आहेत. गोष्टी कृष्णाच्या प्रेमपाशांत पडलेल्या प्रमदा होत. कृष्ण त्यांच्या बरोबर रतिक्रीडा करीत आहे आणि रसाचे सागर उडवीत आहेत. रसाच्या रेलचेलींत गोपी आपापले

भान विसरून जात आहेत आणि परमात्मा जो श्रीकृष्ण त्याच्या स्वरूपांत तल्लीन होऊन जात आहेत अशा प्रकारचा नरसिंह मेहेताचा वैष्णवमार्ग झळमळीत प्रपंचापासून मुक्त आहे. सांप्रत काळीं वैष्णवाच्या मंदिरांत भजल्या जाणाऱ्या कृष्णचरित्रासारखा त्यांचा पंथ नव्हता. त्यांच्या सांप्रदायांत अद्वैतमतप्राधान्य होतें. मेहेताजींचे कृष्ण असें आहेत कीं, त्यानां " नेति नेति कही निगम वामे " याप्रमाणें मेहेताजी वैष्णवी सांप्रदायाचें मोठे भक्त होते. वल्लभी पंथवाल्यानीं त्यांचें नांव वल्लभ भक्तांतून काढून टाकले आहे. मेहेताजी वल्लभी पंथाचे नव्हतेच; कारण कीं, वल्लभाचार्यांचा जन्म संवत १५३५ त झाला होता. त्यांची मतें वल्लभी सांप्रदायाच्या विरुद्ध अशीं आहेत आणि म्हणून कदाचित् त्यांचे नांव वल्लभी वैष्णवांत फार पूजनीय नसावें ! मेहेताजीसारखी वैष्णव वेदांताची वचनें मूर्तिपूजक वल्लभांच्या अनुयायानां कशी रुचतील ? वस्तुत: मेहेताजीचा सांप्रदाय स्वतंत्र होता. त्याच्या कवितेवरून इतके स्पष्ट समजून येतें कीं, मेहेताजी कृष्णमूर्तीला केवळ एकाग्र चित्त करण्याचा मार्ग समजत असत. मेहेताजी जोपर्यंत संसारी होते तोपर्यंत त्यांनीं अद्वैत ब्रम्हाची कृष्णपूजेच्या रूपानें भक्ती केली आणि संसाराच्या उपाधींतून मुक्त झाल्यानंतर त्यागवृत्तीनें वैराग्यादि साधनें करून अखंडानंदाचा अनुभव घेण्यास त्यांनीं आरंभ केला.

बाल्यावस्थेंत ब्रम्हचाऱ्याचें, संसारांत ग्रहस्थाश्रमाचें, आणि वृद्धावस्थेंत वैराग्याचें, व्रत त्यांनीं आचरिलें.

मेहेताजींना धर्म प्रिय होता परंतु त्यांना कर्माची काथ्याकुट लेशमात्र प्रिय नव्हती. परंतु जोंपर्यंत त्यांनीं निर्गुण ब्रम्हाचें यथार्थ ज्ञान मिळविलें नव्हतें तोपर्यंत कृष्णमूर्ति–सगुण ईश्वराची भक्ती करून आपल्या सर्व वृत्तींचा नाश करण्याचें कार्य त्यांनीं करून घेतलें, आणि त्याच्या शेवटीं

" जेने जेवुं भावे तेने तेवुं भायरे "

या वचनाप्रमाणें त्यानीं ब्रम्हरूप ओळखलें. दंभाचा मात्र त्यांना पुरा वीट होताः—

" शुं थयुं स्नान सेवा पूजा थकी । शूं थयुं घेर रही दान दीधे ।
" शुं थयुं धरि जटा भस्म लेपन करे । शुं थयुं वाळ लुंचन कीधे॥
" शुं थयुं नपनें तीरथ कीधा थकी, शुं थयुं माळ ग्रही नाम लीधे,"
" शुं थयुं तिलकने तुलसी धर्मो थकी, शुं थयुं गंगजल पान कीधे "
" शुं थयुं वेद व्याकरण वाणी वदे, शुं थयुं रागने रंग जाणे, "
" शुं थयुं खट् दरसन सेवा थकी, शुं थयुं वरणना भेद आणे. "
" ए छे परपंच सहु पेट भरवा तणा, आत्माराम परि ब्रह्म न जोयें;"
" भणे नरसैयो के. तत्व दर्शन विनां रत्नचिंतामणि जन्म खोयो"

त्यांचें म्हणणें ' मनमे चंगा तर काटवटमे गंगा ' याप्रमाणें असें. मूर्तिपूजेपेक्षा भक्तिभाव विशेष फलप्रद आहे. ब्रह्मपदाला जाण्याचा तोच उत्तम उपाय आहे. आचार व विचार हे उभय तर एकमेकाला अनुसरणारेच असले पाहिजेत.

" मन एथ जाण्युं जे, हुं हरीजन थयो वैष्णवपद गायने भक्तिभावें"
" करणी तो कागनी, होइ करे हंसनी, पेटनी वारता कळी न जावे."

अशा मनुष्याला भक्त म्हणतांच येणार नाहीं. विचार, वाणी व आचार हे तीनही एकसारखे असलेच पाहिजेत. धर्मकर्मांची बंधनें फुकट आहेत. जेव्हां धर्माचें मर्म समजतें तेव्हां कर्मांचा भ्रम तुटून जातो. कर्मभेदानें वर्ण-भेद होतो. परंतु ज्यानें निष्काम होऊन सत्‌चिदानंद स्वरूपाला ओळखलें आहे त्याच्या मनांत भेदभाव उरतच नाहीं.

नरसिंह मेहेता अद्वैत मताचे होते. ईश्वर एक आहे, तो सर्व ठिकाणीं आहे असें ते मानीत होते. हें जगत मायेचें जाळें आहे. एकाच ईश्वराला भजावें कारण कीं, " घणा घरनो जे होय परोणो, तेनु मन स्थिर न होय रे." अनेक देवांना पूजिल्यानें मुक्ति प्राप्त करून घेतां येत नाहीं. मेहेताजीचे तत्वदर्शन तरः--

" अद्वैत ब्रह्म अनोपम लीला, असंख्य जुगना एहेवोरे. "

\+ + + + + +

" चित्त चैतन्य विलास तद्रूप छे, ब्रह्म लटकां करे ब्रह्म पासे."

ही सृष्टि ब्रह्मविलास आहे. ब्रह्म त्यांत विलसत आहे. ते स्वतः अविकृत आहे.

" जीवने शिव तो, आप इच्छाए थया, रची परपंच चौद लोक कीधा'
" भणे नरसैयो ए, तेज तुं तेज तुं, अने समर्थोथी कई संत सीध्या"

'जीव व शिव, आत्मा आणि परमात्मा, यांचा जो भेद झाला आहे तो फक्त इच्छेचा परिणाम आहे. वस्तुतः शिव हाच जीव आहे, जीव हा शिवाचाच अंश आहे. आणखी मनुष्याला उद्देशून ते म्हणत आहेत कीं:—

" तुं अल्पा कोणने कोने वळगी रह्यो, वगर समजे कहे म्हारुं म्हारुं"
" देह तारी नथी, जो तुं जुगते करी, राखतां नय रहे निश्चे जाय"
" पटकें माथापरी, अटक चरणे हरे, वटक मां वात सुणतांज साची'
" आशनुं भुवन आकाश सूधी रह्युं, मूढ ए मूळथी भींत काची."

\+ + + +

" चेतरे चेत दिन चार छे लाभना, लींबु ल्हेकावतां राज लेवु."

अशा रीतीनें मेहेताजी मनुष्याला उपदेश करताना 'ब्रह्म सत्यं जगन्मिथ्या' या सिद्धांताचे स्पष्टीकरण करीत

आहेत. पायाशिवायची इमारत कशी क्षणमात्र टिकणारी असते, त्याचें आपणाला ते ज्ञान करून देत आहेत. हे पामरा,

" भक्ति भूतल विषे नव करी ताहरी, खांड्यां संसारनां थोथां ठाकां

+ + + +

" मातने तान सुत, भ्रात टोळे मल्यां, दोहिली वेळा सौ दूर जाये

म्हणून तूंच सावध हो आणि उठून पहा. तुझें इथें कोण आहे ? "ज्ञाने तें दोड धरी, समरने श्रीहरी, आव्यो संसारमां शुं रे करवा ? मायानी जाळमां मोह पामी रह्यो, अवनि उपर अवतर्यो भार करवा ?" अशी तुझी अधम स्थिति आहे. ऊठ, निराकार ब्रह्माला समजून घे. तो सर्व आत्म्यांचा परमात्मा आणि सर्व पदार्थांत असलेली आदि-शक्ति आहे. मेहेताजी श्रीहरीला अखिल ब्रह्मांडांत पाहूं शकले. तो सूक्ष्म रूप धारण करतो आहे. "विविध रचना करी, अनेक रस लेवानें, जिव थकी जीव थयो एज आशे." हे वचन शांकर मताला अनुसरणारें आहे. तो 'श्रीहरि, देहांत देव, तेजांत तत्व, शून्यांत शब्द, वारा, पाणी व भूमि स्वतःच आहे. ते "घाट घडिया पछी, नाम रूप जुजवां, अन्ते हेमनु हेम" आहे. मेहेताजी म्हणतात कीं, हे प्रभु !

" वृक्षमां बीजतुं बीजमां वृक्ष तुं जोऊं पटंतरो एज पासे "

तूं पंच महाभूतांचा कर्ता आहेस. तूं अद्वैत ब्रह्म 'वाणी शिवाय' आहेस. मुरलीच्या नादांत, ऐकण्याच्या आवाजांत आणि चालण्याच्या घुमघुमाटांत " तोंच मीं तोंच मीं," अशा शद्वांचे घोष ऐकवून राहिला आहेस. तूं—

" ज्यां लगी ज्यम छे, त्यामनो त्यमछे, वधे घटे नहि वहालोरे;"
" आवे ना जाए, जाए मा आवे, नही भर्यो नहीं ढालोरे. "

तसा तूं 'पूर्णानंद, स्वतः पुरुषोत्तम' आहेस. तूं प्रेमदृष्टीला दिसणारा आहेस, स्पर्शाला अज्ञेय आहेस, डोळ्यांनीं दिसत नाहींस, कानांनीं ऐकू येत नाहींस. तुझे " बोल गूढ " आहेत. तूं " प्रेमाच्या तंतूंत " च सांपडशील असा आहेस. " चतुर होय ते चित्तमां चेते, मुरखने शो चटकोरे. " जो ज्ञानी आहे तो आपल्या यथार्थ ज्ञानानें मोहमायेचा नाश करून परमतत्वाला पावतोच. मूर्ख, हटवादी लोकांच्या हृदयांत रसाच्या लहरी यत्किंचितहि उठत नाहीत. मेहेताजी परब्रम्हाला एका दीपकाची उपमा देत आहेत. तो दिवा असा झळकतो आहे कीं, कोटि सूर्याचें तेजहि त्याच्यापुढें कमीच ठरेल. त्या दिव्याला तेल लागत नाहीं, वात लागत नाहीं; तो स्वयंप्रकाश आहे. ते म्हणतात कीं, हें ब्रम्ह " वासना तारी घट घटमां, जेम

चाळमां पडयुं तेल;" "तारी वासनानो मने पास लाग्यो जेम बहेठे फुलेल."

मेहेताजी ज्ञानी होऊन गेले होते. त्यांनीं 'जगाच्या चटक्यानें' बाजूला सरून ब्रम्हाला पाहिलें होतें. याप्रमाणें त्यांचें तत्त्वज्ञान थोडें पण लहान, खोल पण सर्वगामी असल्यानें त्यांची आत्मानुभवि कविता सामान्य जनसमाजाला अतिशय प्रिय आहे. मेहेताजी अशा वेदांताच्या शुष्क सिद्धांताला प्रेमरंगानें रंजित करून वाचकवृंदांच्या भक्तीला रसिक करून सोडीत आहेत, हें त्यांच्या काव्यशक्तीचें मुख्य लक्षण आहे. नरसिंह मेहेता भक्तिज्ञानमार्गी असून त्या साधनाचे प्राप्तीसाठीं त्यांचें ज्ञान हाच त्यांचा धर्म आहे. अर्थात त्यांचें तत्त्व असें होतें कीं, धर्म म्हणजे ज्ञान, आणि ज्ञान म्हणजे धर्म. जसे त्यांचे विचार असत तसें ते बोलत आणि जसें ते बोलत तसें ते करीत होते.

आतां आपण मेहेताजींनीं ठरविलेल्या संसारनीतीवर किंवा नित्यकर्माचे विषयावर थोडेसें बोलून त्यांच्या जीविताच्या अंतःकालासमीप जाऊं. मेहेताजीनीं कधींहि वैराग्याचा बोध केला नाहीं व म्हणून त्यांनीं विवेकी सांसारिकांनां उपयुक्त अशा कित्येक आचरणसूत्रांची नोंध करून ठेवली आहे. त्यांचें मत असें होतें कीं, प्रत्येक

जणानें प्रात:काळीं उठून आलस्याचा त्याग करावा आणि नंतर आपापल्या कर्मांस प्रवृत्त व्हावें.

"जोगिया होय तेणे जोग संभाळवा भोगिया होय तेणे भोग त्यजवा."

"पतिव्रता नारीए कंथने पूछवुं अने कंथ कहे तेने चित्त धरवुं."
"आपणे आपणा,धर्म संभाळवा, कर्मनो मर्म लेयो विचारी;"

*　　*　　*

"दुष्टनी संगत, दुष्टमति उपजे" म्हणून तशा मनुष्यापासून दूर असावें. आणि "विमळ कीधे वपू शुद्ध न थाय" त्या योगानें हृदय शुद्ध ठेऊन परमात्म्याची भक्ति करावी. "ज्ञानदीप कथी तिमिर नासे." तेवढ्यासाठीं परम पुरुषाचें–'सोन्याच्या पाळण्यांत' झोकें देतानां श्रीहरीचें ज्ञान मिळविण्यासाठीं खटपट करावी, हें आपलें कर्तव्य आहे, असें ते म्हणत असत:–याबरोबर इतकेंहि ध्यानांत ठेवावें कीं, भक्तिरसांत मत्त होऊन, आरंभिलेल्या संसाराला टाकून देऊं नये. "संसार वेवार सर्वे साचवित अने विकारथी वेगळा रहित" त्यांतच खरें मनुष्यत्व आहे. समदृष्टि ठेवणें हा सर्वांत उत्तम मार्ग आहे.

## उपसंहार.

वरीलप्रमाणें आपण मेहेताजींचें चरित्र आणि त्यावरून घेण्यास योग्य शिक्षण या गोष्टींचें ज्ञान संपादन केलें आहे. त्यांच्या सांसारिक, नैतिक आणि ज्ञानात्मक वचनांचें पृथक्करण करून त्यावरून मेहेताजींच्या भक्तिभावावर कसा आणि किती परिणाम झाला, त्याचें आपण अवलोकन केलेंच आहे. त्यांनीं संसारांत राहून मोहमायेंत न सांपडता भक्तिरूपी शस्त्रानें काम, क्रोध, मद, लोभ, मोह, इत्यादि आसुरी वृत्तींचा संहार केला होता ही गोष्ट ध्यानांत ठेवण्याजोगी आहे. त्यांचें सर्वोत्कृष्ट कृष्णप्रेम; त्यांच्या सात्विक मनोवृत्ति; समजातीय प्राण्यांविषयीं त्यांचा सद्भाव; त्यांची शुद्धता आणि पवित्रता; त्यांची एकनिष्ठ भक्ति, सात्विक आणि क्षमाशील प्रकृति; त्यांची नम्रता आणि परमेश्वराविषयींची पूर्ण श्रद्धा; त्यांचे दृढ सिद्धांत आणि त्यांचें पालन; सुख-दुःखांतील सारखेपणा, आणि त्यांची परमात्म्याशी झालेली एकतानता—हे सर्व गुण इतके चित्ताकर्षक आहेत कीं, ते सर्व प्राण्यांना आदर्शभूत व अनुकरणीय होऊन बसले आहेत. आपल्यांत तें चें तेंच हृदय तो चा तोच आत्मा, तें चें तेंच तेजांश, अनुद्भूत अवस्थेंत राहिले आहेत. पण योग्य रीतीनें त्यांचें पोषण केल्याशिवाय त्यांचा अविर्भाव होऊं शकणार नाहीं. हीं सर्व तत्त्वें मनुष्यत्व प्राप्त होण्याला आपणाला निःशंक उपयोगी

पडतील; परंतु शोचनीय गोष्ट ही कीं, मेहेताजीसारखी प्रभुप्रेरणा आपण कोठून आणावी ? आणखी आपला नैसर्गिक स्वभावच असा आहे कीं, त्याचा सदोदित सदुपयोग करणें हें मोठें दुर्घट कार्य आहे. असे पुण्यात्मे तर फार थोडे जन्म घेतात कीं, जे आत्मसयंमन करून ठरविलेलीं कामें पार पाडूं शकतात. अशी आपली चंचल आणि चपल स्थिति असून मनुष्यत्वाला देवत्व देणें आणि देवत्वाला मनुष्यत्व देणें हा अत्यंत गहन प्रयत्नाचा विषय झाला आहे.

अशा घरादाराशिवायच्या, साधनाशिवायच्या, नागर जातीशिवायच्या म्हणविणाऱ्या, कोणत्याही प्रकारच्या 'कट-कटींतून विमुक्त असलेल्या मेहेताजींनीं उच्च प्रकारची आणि विशेष प्रशंसनीय वस्तुलाभासाठीं उपयोगी येणारी कुललज्जा बाजूला ठेविली होती. भगवान श्रीकृष्णांनीं कालिंदीच्या कांडावर उभ्यानें आपल्या मोहन मुरलीच्या मधुर आला-पानें गोपींच्या अंतःकरणाला जिंकून घेतलें होतें; हा परम पुरुष सोळा सहस्र गोपींबरोबर नृत्यगायन करून प्रेम-लीलेंत विलास करीत असे. नरसिंह मेहत्यांनीं अशा भक्ति ज्ञानाचीं तत्त्वें जाणिलीं होतीं. ते ' अलक जागवून परमानंदाप्रत पावले होते. ज्यांनीं आपलें नांव ब्रह्मर्षि-भक्त, कवि व ज्ञानी अशा रूपानें आपल्यामागें अमर करून ठेवलें,' असे हे मेहेताजी निरपेक्ष सुखाचा शाश्व

लाभ घेण्यासाठीं मोठ्या वयांत विदेही झाले. ते कोणत्या दिवशीं समाधिस्थ झाले, याची माहिती बरोबर मिळत नाहीं. म्हातारपणाविषयीं लिहिलेलें त्यांचें पद वाचनीय आहे. आपल्या भक्तराजाच्या उत्तर अवस्थेच्या गंभीर शद्बांचें रव आपल्या कानांत घुमवून आपल्याला शान्तिरसांचें स्नान ते करवीत आहेत. ते असे कीं, " सुखमां संभारजो रे जो होय पेला भवनुं पुन्य. " अशा या भक्तराजाचा व गुर्जर देशाच्या आद्य कवीचा सदोदित जय होवो !

समाप्त.

श्रीसयाजी-साहित्यमालेतून प्रसिद्ध झालेले

# " जीवन कथा "

## या विषयावरील ग्रंथ.

[ साहित्यविभाग ]

१ (८) **प्रेमानंदः**--भानुसुखराम निर्गुणराम महेता, (१९१८) किं. १-०-०

२ (१४) **दयारामः**--जगजीवनदास दयाळजी मोदी, (१९१८) किं. ०-११-०

३ (२०) **मीरांबाईः**--भानुसुखराम निर्गुणराम महेता, (१९१८) किं. ०-१२-०

४ (३०) **गिरधरः**--जगजीवनदास दयाळजी मोदी, (१९१९) किं. ०-१४-०

५ (३३) **भालणः**--रामलाल चुनीलाल मोदी, (१९१९) १-०-०

६ (४०) **तुकारामः**--भरतराम भानुसुखराम महेता, ओ. टी. सी. ई. (१९२२) किं. १-०-०

७ (४५) **विष्णुदासः**--भानुसुखराम निर्गुणराम महेता, (१९२०) किं. १-०-०

८ (६२) **दलपतरामः**--काशिशंकर मूळशंकर दवे, (१९२१-१९२५) किं. १-२-०

९ (७४) **मीरांबाईः**-दाजी नागेश आपटे, बी. ए., एलएल. बी., "मीरांबाई" नामक गुजराती भाषामा प्रसिद्ध थयेला पुस्तकनुं मराठी भाषांतर (१९२३) किं. ०-१५-०

१० (१०४) **शेक्सपियरः**-चंदुलाल मगनलाल डॉक्टर, बी. ए., एलएल बी., B. H. Serford's "Shakespeare" नो गुजराती अनुवाद छे. (१९२६) ०-११-०

११ (१२७) **पं. जगन्नाथराय चरित्र व सं. गंगालहरी:**-
रामराव मार्तंड भांबुरकर, **मराठी** (१९२८) १-०-०

१२ (१३३) **वल्लभ:**-( प्रेमानंदसुत ) प्रो. गजेंद्रशंकर लालशंकर
पंड्या, एम्. ए., बी. टी. ( १९२८ ) किं. १-०-०

१३ (१७४) **महिपतराम**:-भानुसुखराम निर्गुणराम महेता,
( १९३० ) किं. १-१-०

१४ (१९१) **नरसिंह महेता**:--जयसुखराय पु. जोशीपुरा, एम्. ए.
( १९३१ ) किं. ०-११-०

१५ (२१६) **नरसिंह महेता**:--रा. दाजी नागेश आपटे, बी. ए.,
एलएल. बी. ( १९३३ ) किं. ०-६-०